। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १८९ वा । शुक्रवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# गुजरातचे नवे कॅबिनेट, २६ मंत्र्यांनी शपथ घेतली



**गांधीनगर/वृत्तसंस्था** : गुजरातमधील भूपेंद्र पटेल सरकारच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. २६ आमदारांना मंत्रीपद देण्यात आले आहे, ज्यात तीन महिलांचा समावेश आहे. मुख्यमंत्र्यांसह आठ मंत्री पटेल समाजाचे आहेत. आठ ओबीसी, तीन एससी, चार एसटी आणि तीन महिला आहेत. १९ नवीन चेहरे आहेत.

हर्ष संघवी हे शपथ घेणारे पहिले होते. त्यांना उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. त्यांनी यापूर्वी गृहमंत्रीपद भूषवले होते. क्रिकेटपटू रवींद्र जडेजाच्या पत्नी रिवाबा यांनाही मंत्रीपद देण्यात आले आहे.

गुरुवारी, सर्व १६ मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना आपले राजीनामे सादर केले. हा फेरबदल २०२७ च्या राज्य विधानसभा निवडणुकीच्या तयारीशी जोडला जात आहे. गुजरात मंत्रिमंडळात मुख्यमंत्री, आठ कॅबिनेट मंत्री आणि आठ राज्यमंत्री (एमओएस) यांच्यासह १७ मंत्री होते. ही संख्या आता २६ झाली आहे.

**फेरबदलाची ५ कारणे, पटेल समुदायासाठी अधिक जागा**

रणनीती बदल: फक्त तीन वर्षांत, भाजपने केवळ मुख्यमंत्र्यांनाच नव्हे तर संपूर्ण सरकार बदलले आहे. पक्षाने भूपेंद्र पटेल यांच्या नेतृत्वाखालील सर्व १६ मंत्र्यांना राजीनामा देण्यास सांगितले, ज्यामुळे त्यांना नवीन मंत्रिमंडळ स्थापन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. कमकुवत कामगिरी: अहवालांनुसार, अनेक मंत्र्यांची कामगिरी खराब होती. पक्ष नेतृत्व नवीन चेहऱ्यांना घेऊन सरकारची कामगिरी सुधारू इच्छित होते.

जातीय समीकरणे: मागील मंत्रिमंडळात मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे एकूण १६ मंत्री होते. भाजप गुजरातच्या पटेल समुदायाला अधिक मंत्रिमंडळ पदे देऊ इच्छित होता.

स्थानिक निवडणुका: पुढील काही महिन्यांत गुजरातमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. गेल्या महिन्यात झालेल्या बिसावदर विधानसभा पोटनिवडणुकीत पक्षाच्या पराभवानंतर, भाजप नवीन चेहऱ्यांना संधी देऊ इच्छित आहे.

अधिक नेत्यांचा समावेश: गुजरात विधानसभेत १८२ जागा आहेत. नियमांनुसार, एकूण जागांपैकी १५% पर्यंत मंत्री असू शकतात. यानुसार, गुजरातमध्ये मुख्यमंत्र्यांसह २६ मंत्र्यांची नियुक्ती करता येईल. सरकारमध्ये आणखी नेत्यांचा समावेश करता येईल.

**भूपेंद्र यांचे हे तिसरे मंत्रिमंडळ असेल**

भूपेंद्र सिंह यादव पहिल्यांदा सप्टेंबर २०२१ मध्ये मुख्यमंत्री झाले. विजय रुपानी यांच्या जागी त्यांची मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. विधानसभा निवडणुकीनंतर, १२ डिसेंबर २०२२ रोजी, ते १६ आमदारांसह तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. आता नवीन मंत्रिमंडळ स्थापन होत आहे, ज्याची चर्चा रात्री उशिरापर्यंत सुरू होती. तथापि, असे मानले जाते की निवृत्त मंत्रिमंडळातील एक किंवा दोन चेहरे पदोन्नतीसह नवीन मंत्रिमंडळात परत येऊ शकतात.

### गुजरातचे नवे मंत्रिमंडळ: १९ नवीन चेहरे

अर्जुन मोढवाडिया, पोरबंदर
रिवाबा जडेजा, जामनगर
ईश्वरसिंह पटेल , अंकलेश्वर
जीतू भाई वाघाणी, भावनगर पश्चिम
नरेशभाई मगनभाई पटेल, गणदेवी
पीसी बरंड़ा,धोलका
कांतिलाल अमृतिया, मोरबी
कौशिक वेकरिया, अमरेली
रमेशभाई कटारा,फतेपुरा
जयराम गामित, नजर
दर्शना एम वाघेला,आसारवा
प्रद्युमन वाजा, कोडीनार
मनीषा वकील, वडोदरा शहर
प्रवीण माली, डीसा
संजयसिंह महीडा, महुधा
रमण सोलंकी, बोरसद
कमलेशभाई पटेल, पेटलाद
त्रिकम बीजल चांगा,अंजार
स्वरूपजी ठाकोर, वाव

## भारतीय हवाई दलाची ताकद वाढली, शत्रूचे धाबे दणाणणार

### स्वदेशी तेजस MK1A लढाऊ विमानाचे उड्डाण



**नाशिक/प्रतिनिधी** : नाशिकमध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या फॅक्टरीत तयार झालेल्या पहिल्या LCA तेजस (Tejas MK-1A) लढाऊ विमानाचे यशस्वीपणे उड्डाण करण्यात आले आहे. त्याच बरोबर HAL च्या HTT-40 प्रशिक्षण विमानांच्या दुसऱ्या उत्पादन लाईनचे उद्घाटनही या दिवशी करण्यात आले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत तेजस विमान हवेत झेपावले. या विमानाचं उड्डाण जरी झाले असले तरीही भारतीय हवाई दलात त्याचा समावेश होण्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहे.

तेजस MK-1A हे भारताच्या स्वदेशी लढाऊ विमानांच्या क्षमतेचा एक टप्पा आहे. परदेशांवर अवलंबित्व कमी करणे हे याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. हे विमान पूर्वीच्या मॉडेल्सपेक्षा अधिक सक्षम व बहुउद्देशीय असणार आहे. ज्यामुळे हवाई दलाच्या लढाऊ तुकडींमध्ये नवीन वर्षभरात बदल अपेक्षित आहेत. तेजस भारताचं स्वदेशी लढाऊ विमान आहे. ते ४.५ पिढीतील मल्टी रोल फायटर जेट आहे. तेजस हवाई संरक्षण, जमिनीवर हल्ला आणि सागरी हल्ला करण्यास सक्षम आहे. याआधी तेजस Mk1 भारतीय हवाई दलात आहे परंतु Mk1A त्याचे आधुनिक व्हर्जन आहे. त्यात नवीन तंत्रज्ञान आहे जे या विमानाला अधिक सक्षम बनवते.

तेजसने गेल्या काही वर्षांत अनेक चाचणी उड्डाणे केली आहेत, परंतु आजचे उड्डाण विशेष होते. कारण ते हवाई दलात समाविष्ट होण्यापूर्वी तयारीचा अंतिम टप्पा होता. एचएएलने खूप प्रयत्न केले आहेत. इंजिन विलंबामुळे हा प्रकल्प काहीसा मंदावला होता, परंतु जनरल इलेक्ट्रिकने आता चार इंजिने दिली आहेत. यावर्षी एकूण १२ इंजिन जनरल इलेक्ट्रिककडून मिळणार आहे. चाचणीत स्वदेशी बीवीआर, एअर टू एअर मिसाइल आणि लेजर गाइडेड बॉम्बची यशस्वी चाचणी केली आहे. भारतीय हवाई दलाला तेजससारख्या विमानांची गरज आहे. २६ सप्टेंबरला मिग २१ चे २ स्क्वॉड्रन एकूण ४० विमानं निवृत्त केली आहेत. त्यामुळे वायूसेनेची फायटर स्क्वॉड्रनची संख्या ३० झाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान चीनकडून पाचव्या पिढीतील लढाऊ विमान खरेदी करत आहे. चीनही त्यांची सर्व विमाने पाचव्या पिढीत बदलत आहे. त्यामुळे भारताला ताकद वाढवावी लागेल. तेजस याच ताकदीचा एक भाग आहे.

## भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधन, वयाच्या ६७ व्या वर्षी घेतला अंतिम श्वास

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : आमदार कर्डिले यांना पहाटे त्रास जाणवू लागल्यानंतर त्यांना अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी नगर-नेवासा आणि राहुरी मतदार संघातून विधानसभेचे प्रतिनिधित्व केले होते. ते सहाव्यांदा आमदार होते.

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार तसेच अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री शिवाजी भानुदास कर्डिले यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. वयाच्या ६७ वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने नगर जिल्ह्याच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शुक्रवारी पहाटे त्यांचे निधन झाले आहे.

## दिपावली सणानिमीत्त गांधीचौक पोलीसांची सतर्कपणे पायी पेट्रोलींग



**लातूर/प्रतिनिधी** : सध्या जिल्हयासह लातूर शहरात दिपावली सण मोठ्या आनंदात साजरा होत असतो त्यानिमीत्त शहरातील व जिल्हयातील अनेक भागातुन नागरीक खरेदी साठी लातूर शहरात येत असतात त्यामुळे लातूर शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या गंजगोलाई, सराफ लाईन, कापड लाईन, भुसार लाईन, भांडी गल्ली, मज्जीद रोड या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरीकांची गर्दी होते व शहरामध्ये वाहतुक कोंडी होवुन येणारे नागरीकांना त्याचा त्रास होत असतो. त्यामुळे लातूर जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री.अमोल तांबे, अपर पोलीस अधिक्षक श्री. मंगेश चव्हाण उपविभागीय पोलीस अधिकारी श्री समीरसींह साळवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे गांधी चौक थे पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे गांधी चौक येथील अधिकारी / अंमलदार तसेच दंगा नियंत्रण पथकाचे अंमलदार यांचे वतीने नागरीकांचे सुरक्षिततेसाठी तसेच नागरीकांना काही अडचण असल्यास पोलीसांकडुन तात्काळ प्रतिसाद मिळणेसाठी तसेच काही गैरप्रकार होवु नये महिलांची छेडछाड होवु नये या करीता लातूर शहरातील गंजगोलाई, सराफ लाईन, कापड लाईन, भुसार लाईन, भांडी गल्ली, मज्जीद रोड, सुभाष चौक, दयाराम रोड या भागात नियमितपणे पायी पेट्रोलींग करण्यात येत आहे.

## सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या मोफत पूर्वप्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**जिल्हा सैनिक कल्याण केंद्रात २ नोव्हेंबर रोजी मुलाखतीचे आयोजन**

**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय सशस्त्र सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या परीक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी नाशिक येथील नाशिक रोडच्या छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये राज्य शासनातर्फे राज्यातील नवयुवक व नवयुवतींसाठी ३ नोव्हेंबर २०२५ ते १२ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६३ आयोजित करण्यात येत आहे. या कोर्ससाठी प्रशिक्षणार्थीची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात येणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात २ नोव्हेंबर २०२५ रोजी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी केले आहे.

मुलाखतीस येताना डिपार्टमेंट ऑफ सैनिक वेलफेअर (डीएसडब्ल्यू) यांच्या संकेतस्थळावर सर्च करून त्यामधील एसएसबी-६३ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट यामधील माहिती पूर्ण भरून सोबत घेवून यावे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये एस.एस.बी कोर्ससाठी प्रवेश मिळण्यासाठी नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येतांना सोबत घेवून यावेत.

उमेदवार कंम्बाइंड डिफेंस सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएसई-युपीएससी) अथवा नॅशनल डिफेंस ॲकडमी एक्झामिनेशन (एनडीए-युपीएससी) पास झालेली होवून सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेला असावा. एनसीसी 'सी' सर्टिफिकेट 'ए' किंवा 'बी' ग्रेडमध्ये पास झालेले आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस. एस. बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. युनिवर्सिटी एन्ट्री स्कीमसाठी एस.एस.जी कॉल लेटर असावे. शिफारस केलेल्या यादीत नांव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी: ीरळपळपस. लिंलपरीहळज्ञसारळश्र.ले अथवा ०२५३-२४५१०३२ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा ९१५६०७३३०६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून लातूर जिल्ह्यातील नवयुवक व नवयुवतींनी या संधीचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. पांढरे यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**अन्न पेय उत्पादनावर ORS लेबलिंगचे नियम सरकारने बदलले**

## यश मिळविण्यासाठी कष्टाला पर्याय नाही- ऑलिंपियन जलतरणपटू वीरधवल खाडे

**लातूर/प्रतिनिधी** : स्पर्धेत यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण कष्टाशिवाय पर्याय नसल्याचे प्रतिपादन ऑलिंपियन वीरधवल खाडे यांनी राजर्षी शाहु महाविद्यालयाच्या संकुलात राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले. यावेळी बोलताना त्यांनी लातूर येथे प्रथमच या स्पर्धा होत असून यामुळे लातूर जिल्ह्यात जलतरणाची संस्कृती रुजून भविष्यात आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, सचिव डॉ. अनिरुध्द जाधव, उपाध्यक्ष पी. आर. देशमुख तसेच सदस्य गोपाळ शिंदे, अड. सुनिल सोनवणे, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अनिरुध्द बिराजदार यांनी केले.

आजचे निकालः-

१४ वर्षाखालील मुले- १) २०० मी. फ्रिस्टाईल- शौर्या कोंढरे, कोल्हापूर (२.१६.६४) विहान सोरटे, पुणे अरव महाजन, मुंबई २) २०० मी. बटरफ्लाय- कबीर सोनवले, मुंबई (२.३५.१७) रुद्र वाडकर, शिवछत्रपती क्रीडापीठ आयुष राजापूरे, पुणे ३) ४ x १०० मी. फ्रिस्टाईल रिले- शिवछत्रपती क्रीडापीठ (४.४४.२८) मुंबई , नागपूर

१४ वर्षाखालील मुली-१) २०० मी. फ्रिस्टाईल- सलोनी साळुंखे, पुणे (२.२४.६४), काईजा शंकर, पुणे, लक्ष्मी सर्फराजु, मुंबई २) २०० मी. बटरफ्लाय- श्रीनिती यश मुंबई (२.४४.५९) काईजा शंकर, पुणे सलोनी साळुंखे, पुणे ३) ४ x १०० मी. फ्रिस्टाईल रिले- पुणे (५.२५.४०) कोल्हापूर, नागपूर

१७ वर्षाखालील मुले-१) २०० मी. फ्रिस्टाईल- अर्चित मोरवेकर, मुंबई (२.०२.१४) रिशी भगत, कोल्हापूर वरद मारणे, पुणे २) ८०० मी. फ्रिस्टाईल- रिशी भगत, कोल्हापूर (९.१५.१३) ओमर जलाल, मुंबई चैतन्य शिंदे, शिवछत्रपती क्रीडापीठ ३) २०० मी. बटरफ्लाय- शाल्व मुळे, पुणे (२.१५.६२) ओझस पिंगळे, पुणे राजविरसिंग रहाल, नागपूर ४) ४ x १०० मी. फ्रिस्टाईल रिले- मुंबई (४.१०.३२) शिवछत्रपती क्रीडापीठ, अमरावती

१७ वर्षाखालील मुली-१) २०० मी. फ्रिस्टाईल- अन्वी देशवाल, मुंबई (२.१६.७५) मोनर्वा पती, पुणे, अर्ना आगरवाल, मुंबई २) २०० मी. बटरफ्लाय- आदिती हरीयान, मुंबई (३.००.२९) श्वेता कांबळे, मुंबई अनन्या बिरारी, शिवछत्रपती क्रीडापीठ ३) ४ x १०० मी. फ्रिस्टाईल रिले- नागपूर (६.०८.०८), कोल्हापूर, अमरावती

१९ वर्षाखालील मुले-१) २०० मी. फ्रिस्टाईल- ओम साट्म, मुंबई (१.५९.७१), अजिंक्य नरवाडे, शिवछत्रपती क्रीडापीठ, भक्तीश कुमरे, नागपूर २) २०० मी. बटरफ्लाय- श्वेत पुजारी, मुंबई (२.२१.३८), सोहम वाळके, शिवछत्रपती क्रीडापीठ, रनबीरसिंग गौर, नागपूर ३) ४ x १०० मी. फ्रिस्टाईल रिले- अमरावती (४.२१.२२) शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे

१९ वर्षाखालील मुली- १) २०० मी. फ्रिस्टाईल- वंशिका परती, मुंबई (२.२२.८७), अन्विता देशपांडे, कोल्हापूर, मायरा जाधवानी, मुंबई २) ८०० मी. फ्रिस्टाईल- मायरा जाधवानी, मुंबई (११.०९.९८), सेजल पाटील, शिवछत्रपती क्रीडापीठ, स्नेहा लोकरे, मुंबई ३) २०० मी. बटरफ्लाय- निर्मयी आंबेटकर, मुंबई (२.२९.९१) त्विषा दिक्षीत, पुणे तन्वी धुर्वे, नागपूर ४) ४ x १०० मी. फ्रिस्टाईल रिले- मुंबई (५.२०.५४) पुणे, नागपूर.

## दयानंद शिक्षण संस्था आणि केदार खमितकर अँड असोसिएट्स,लातूर यांच्यात ऊर्जा व्यवस्थापन आणि शाश्वततेसाठी सामंजस्य करार

लातूर : दयानंद शिक्षण संस्था,लातूर आणि केदार खमितकर अँड असोसिएट्स,लातूर यांच्यात ऊर्जा व्यवस्थापन आणि शाश्वततेसाठी सामंजस्य करार करण्यात आला.याप्रसंगी महाऊर्जा एम्पानेल एनर्जी प्लानर व ऑडिटर केदार खमितकर,अभियंता किरण खमितकर,दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड,प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,प्राचार्य डॉ.पुनम नथानी, प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस,प्राचार्य प्रीती पटवारी,प्रा.अनिलकुमार माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन व संरक्षण करीत ऊर्जा ऑडिट क्षेत्रामध्ये सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण आणि सहाय्य प्रदान करण्यासाठी सामंजस्य करार हे एक उत्तम व्यासपीठ आहे,असे त्यांनी सांगितले तर बीईई केंद्रीय विद्युत मंत्रालय प्रमाणित ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर यांनी ऊर्जा व्यवस्थापन आणि शाश्वततेसाठी सामंजस्य करार हा अत्यंत उपयुक्त आहे. दोन्ही समूहातील सदस्यांकडून शैक्षणिक आणि संशोधन कार्यक्रम महाऊर्जा महाराष्ट्र शासन यांची मार्गदर्शक तत्त्वे अनुसरून नियमितपणे अंमलबजावणी करतील असा विश्वास व्यक्त केला.

## चिमटा दयाचा



दर्जाहीन कामाचे
खापर पावसावर फोडले
जात आहे !
चलाख वृत्तीची केली
तितकी प्रशंसा
कमीच आहे !!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## बे-लगाम बोलणारे नेते

देशात बेलगाम बोलणारे नेते दिसून येत असल्याने जनतेनी कोणावर विश्वास ठेवावा हा प्रश्न निर्माण झाला आहे. परदेशात जाऊन भारताचे प्रथम नागरिक म्हणजे पंतप्रधानावर टिका होते. आज केवळ पंतप्रधान यांच्यावर काहिही मत व्यक्त केले जाते. भारताचे पंतप्रधान हे अमेरिकेचे ट्रम्प यांना घाबरतात असे वक्तव्य करणे योग्य नाही. मोठ्या जबाबदार नेत्यांनी असे बालिश मत व्यक्त करणे योग्य नाही. भारत आता जगात महासत्ताधिशाकडे वाटचाल करीत आहे. भारत अमेरिकेला घाबरत नाही, आज भारतीयांची कामगिरी पाहून तो काही प्रमाणात घाबरला आहे. अमेरिकेला वाटते की, भारताने रशियाशी संबंध तोडावेत, मात्र ते शक्य नाही. भारत व रशिया यांची मैत्री तेलापुरती नाही तर अनेक वर्षाची आहे. हे उघड आहे. आज जरी अमेरिकेचा दबाब असला तरी तो भारत झुकारत आहे. ही बाब दुर्लक्षित करून चालत नाही. मुळात भारताने अमेरिकेचा टॅरिफ झुगारला आहे. तो मान्य नसल्याचे सांगून स्वदेशीचाकडे वाटचाल सुरू केली. भारत बऱ्याच बाबतीत स्वावलंबी बनला असून अनेक बाबी स्वदेशी उत्पादित होत आहेत. अल्पावधित भारत हा जगात स्वयंपुर्णतेबाबत एक नंबरवर देश समजला जाणार आहे. त्यामुळे आज आपल्या देशातील जनता पंतप्रधानाच्या पाठीशी उभा आहे. आपल्या देशात अनेक राज्य हे काँग्रेसकडे होते ते काँग्रेसला आपल्या ताब्यात ठेवता आले नाहीत. त्याच प्रमाणे आज पंतप्रधानविरोधात बोलणे योग्य नाही. बोलण्यापेक्षा पुरावे जनतेला देवुन जनता आपल्यासोबत आली पाहिजे असा विचार केला पाहिजे. आज काँग्रेस आवाज उठवित आहे, याला जनतेचा प्रतिसाद किती प्रमाणात मिळत आहे? अनेक ठिकाणी पदयात्रा काढल्या, याला प्रामाणिक जनतेचा प्रतिसाद मिळणे अपेक्षित होते तो मिळाला नाही. त्यामुळे काँग्रेस पक्षाने विचार करावा की, लोकशाहीप्रधान भारतदेशात विरोधीपक्षनेते पद आहे. त्यामुळे काही ही मत व्यक्त करताना जनतेचा पाठींबा किती मिळेल या बाबीचा विचार केला पाहिजे. उठसुठ पंतप्रधानवर टिका करणे किंवा आपमानित करून बोलणे याचा अर्थ देशातील जनतेचा आपमान केल्यासारखे आहे ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. आज आतून भारतला, टॅम्प काही प्रमाणात घाबरत आहेत. भारताचे जे मित्र नाहीत त्यांच्याशी मैत्री केली जात आहे. त्यांना आर्थिक मदत केली जात आहे. आज पाकिस्तानला मदत करणे म्हणजे त्या अर्थिक बाबीचा उपयोग भारताविरोधी होणार आहे. आज जगात अतिरेकी पोसणारा देश पाकिस्तान आहे. हे जगाला माहिती आहे. भारतात सत्तापरिवर्तन झाले नसते तर भारताचा भुभाग पाकिस्तानला दिला असता असे नंतर समजते. त्यामुळे आपमानित करून बोलू नका तर भारताची ताकद कशा प्रकारे वाढेल याचा विचार करा. देशातील जनतेनी शंभराच्या आत रोखले आहे. याचा अर्थ जनतेच्यामनात अजून प्रेमाची भावना वाढलेली दिसून येत नाही. देशातील जनता विचारी आहे. यावेळी सणात स्वदेशीमालाची अनेकांनी खरेदी केली आहे व करण्याचा संकल्प केला आहे. ट्रम्पला एक ना एक दिवस भारतासमोर झुकावे लागणार आहे. भारतीय गप्प बसून एकणारे आहेत मात्र एक दिवस परिवर्तन घडविणारे आहेत. काँग्रेसने पंतप्रधानावर टिका करणे सोडून द्यावे व काँग्रेसपक्षाचे कार्य करीत राहावे. जनतेसोबत राहावे तरच काँग्रेसचे कार्य दिसून येणार आहे. जनतेचा कल पंतप्रधानाकडे आहे तर मोदी यांच्यावर टिका करणे काँग्रेसचे चालू आहे. आज भाजपाची सत्ता केंद्रात दोन टर्म यशस्वी करून तिसरी टर्म सांभाळत आहेत. त्यांच्या कार्यकाळात भ्रष्टाचार कोणी केला किंवा जेलची हवा खात आहे असे दिसून आले नाही. पारदर्शि कारभार सर्वांना आवडतो. त्यानुसार भाजपाची वाटचाल आहे. जगात भारताने वचक निर्माण केली आहे. जगात भारताचे नाव आदराने घेतले जात आहे. भाजपाच्या तोडीस काँग्रेसने कार्य केले पाहिजे. ते दूरच दिसून येते. टिका करणे आवघड नाही. टिका योग्य का अयोग्य या बाबत तपासले जाते. त्यामुळे आपल्या देशाची प्रतिमा मलिन होणार नाही याची दक्षात घेणे अपेक्षित आहे. आज विचार केला तर पंतप्रधानाचा परिवार राजकारणारत नाही किंवा उद्योग, कारखानदारीत नाही. आज पुर्वीच्या पंतप्रधान व विद्यमान पंतप्रधानाबाबत तुलनात्मक विचार केला तर काही बाबी सहज लक्षात येतील. त्यामुळे इतरावर टिका करण्यापेक्षा आपण काय जनतलेला पटऊन सांगणार आहोत, याचा विचार पहिल्यांदा केला पाहिजे. विचार न करता बोलणे टाळले पाहिजे. ट्रम्प केवळ बोलणारे आहे. आम्ही युद्ध थांबविले आहे. नोबल पुरस्कार मिळावा म्हणून प्रयत्न करीत आहे. जागतिक यशस्वी काम केले, ते मी केले असे मिरवित असल्याचे दिसून येत आहे. याला ग्रामीण भाषेत बालिशपना म्हटले जाते. आज अमेरिकेतील विचारी मंडळी ट्रम्प यांच्या वागण्यावर टिका करीत आहे. उठसुट कोणाला तरी टार्गेट करणे योग्य नाही. पुर्वीपेक्षा प्रगतीपथावर भारत आहे. पुर्वीच्या सरकारपेक्षा या सरकारची प्रगती समाधानकारक आहे. असे असताना पंतप्रधान हे अमेरिकेला घाबरत आहेत असे म्हणणे भारतीय जनतेचा एक प्रकारे आपमान आहे. त्यामुळे विचारपुर्वक बोलणे आवश्यक आहे. आजही उघड कोणी बोलत नाहीत नाही मात्र अनेकजन काँग्रेस म्हणजे गांधी घराणाचे वर्चस्व समजत आहेत. सहज काँग्रेसच्या कार्यकर्त्यास युवराज भेटत नाहीत. असा अक्षेप अनेकांनी यापुर्वीच नोंदविला होता. या बाबत विचार करून वाटचाल करणे अपेक्षित आहे. मुळात पहिल्यांदा थेट पंतप्रधानला टार्गेट करणे सोडून दिले पाहिजे. टिका करण्यापेक्षा आपल्या विचाराशी कितीजन सहमत आहेत. देशातील जनता किती आपल्या विचाराशी सहमत आहेत याचा विचार केला पाहिजे. पाठीशी बहुमत नसताना विचार व्यक्त करणे योग्य नाही. पहिल्यांदा बेलगाम बोलणे टाळले पाहिजे. यातून काहीच साध्य होणार नाही. उलट देशाची बदनामी होऊ शकते. एका व्यक्तीला टार्गेट करणे उचित नाही ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

# उभ्याउभ्या तोंड न लावता घटाघटा पाणी पिता?



पाणी घटाघटा पिऊ नका किंवा उभ्याने पाणी पिऊ नये ही वाक्ये आठवतात का? आई- आजी कायम असे म्हणतात. जाऊ दे म्हणून आपण सोडून देतो. मात्र चुकीच्या पद्धतीने पाणी पिणे आरोग्यासाठी फार धोक्याचे. घाईगडबड असल्यामुळे आपण अनेकदा थांबून पाणी पित नाही. पटापट एकदाच पितो. उभ्याने, गटागट, आणि अनेकदा भांड्याला तोंड न लावता वरतून पाणी पिण्याची सवय सर्व वयोगटांतील लोकांना असते. पण ही सवय आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक ठरते, विशेषतः लहान मुलांसाठी. भांडं उष्टं होऊ नये म्हणून पाणी वरतून पितात. मात्र त्यामुळे शरीराला त्रास होतो.

जेव्हा आपण उभ्याने गटागट पाणी पितो, तेव्हा पाणी थेट घशातून खाली पोटात जाते आणि शरीराला ते योग्यरीत्या शोषून घेण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे पोटातील आम्लपित्त वाढते, आणि पचनावर ताण येतो. शरीरातील द्रव्यांचे संतुलन बिघडते, तसेच किडनीवर अचानक दाब तयार होतो. कारण पाणी झपाट्याने शरीरात फिरते. या सवयीमुळे सांधे दुखणे, गॅस, आम्लपित्त आणि मूत्रपिंडाशी संबंधित समस्या वाढू शकतात.

लहान मुलांची पचनसंस्था अजून विकसित होत असते. त्यामुळे उभ्याने किंवा गटागट पाणी पिण्याने त्यांना पोटात दुखणे, उलट्या, अपचन, पोट फुगणे असे त्रास उद्भवतात. मुलांना ही सवय लागू दिल्यास ती नंतर बदलणे कठीण जाते. त्यामुळे पालकांनी विशेष काळजी घ्यावी.

याशिवाय, अनेक जण भांड्याला तोंड न लावता थेट बाटलीतून पाणी पितात. हे हूसळशपळल वाटले तरी प्रत्यक्षात तोंडातील जीवाणू बाटलीच्या तोंडावर राहतात आणि पुढच्या वेळी त्याच बाटलीतून पाणी घेतल्यास हे जंतू पुन्हा शरीरात जातात. त्यामुळे तोंड, घसा आणि पचनसंस्थेचे आजार होऊ शकतात.

पाणी बसून आणि हळूहळू पिणे ही सर्वोत्तम पद्धत आहे. बसल्यावर शरीर शांत अवस्थेत असते आणि पाणी शरीरभर योग्य रीतीने शोषले जाते. पाणी चघळल्यासारखे हळू प्यायल्याने ते लाळेत मिसळते, ज्यामुळे पचन सुधारते आणि आम्लपित्त कमी होते. अशा प्रकारे प्यायलेले पाणी शरीराला अधिक ऊर्जा आणि तजेलता देते. म्हणूनच, उभ्याने गटागट पाणी पिण्याची सवय टाळा. मुलांना लहानपणापासूनच पाणी बसून, शांतपणे आणि हळूहळू पिण्याची सवय लावा. ही साधी सवय आयुष्यभर पचनसंस्था आणि आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

# सतत थकवा आणि कमजोरी जाणवत असल्यास कोणता ज्यूस प्यावा? ज्यानलगेच मिळेल एनर्जी



आपल्याला सकाळी झोपेतून जागे झाल्यापासून दिवसभर थकवा किंवा कमजोरी जाणवते का? जर या प्रश्नाचं उत्तर हो असेल तर आज आम्ही आपल्याला काही असे पौष्टिक ज्यूस सांगणार आहोत, जे योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने घेतल्यास तुमची एनर्जी लेव्हल वाढवू शकतात. पोषक तत्वांनी भरलेले हे ज्यूस आपल्या एकूणच तब्येतीसाठीही फायदेशीर असतात.

**आवळ्याचा ज्यूस**

आयुर्वेदात आवळ्याला पोषणाचा खजिना मानलं जातं. थकवा आणि कमजोरी दूर करण्यासाठी आंवळ्याचा ज्यूस पिणं खूप फायदेशीर ठरतं. हा ज्यूस प्यायल्यानंतर आपल्याला ताजेतवानेपणा आणि ऊर्जा जाणवेल. तसेच, आवळ्याचा ज्यूस तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यातही मदत करतो.

**संत्र्याचा ज्यूस**

संत्र्याच्या ज्यूसमध्ये व्हिटामिन सोबतच इतरही अनेक पोषक तत्व असतात. कमजोरी कमी करण्यासाठी संत्र्याचा ज्यूस एक उत्तम पर्याय ठरतो. हा ज्यूस हृदयाच्या आजारांचा धोका देखील कमी करण्यास मदत करतो आणि फायबर यात भरपूर असल्यानं पचन तंत्रही चांगलं राहतं. तसेच त्वचेला देखील अनेक फायदे मिळतात.

**बीटाचा ज्यूस**

कमजोरी कमी करून ऊर्जा वाढवण्यासाठी बीटाचा ज्यूस उत्कृष्ट मानला जातो. बीटाचे सेवन केल्याने केवळ रक्तातील हिमोग्लोबिन वाढत नाही, तर शरीरातील अनेक त्रासांपासूनही मुक्ती मिळते. बीटाचा ज्यूस शरीर डिटॉक्सिफाय करण्याचे काम करतो आणि हृदय व मेंदूच्या आरोग्यासाठीही लाभदायक ठरतो.

हे सर्व ज्यूस नैसर्गिक पोषक तत्वांनी भरलेले आहेत. जर तुम्ही दररोज यापैकी एक ज्यूस योग्य प्रमाणात घेतला, तर काही दिवसांतच तुमची कमजोरी दूर होईल आणि शरीरात नवीन ऊर्जा संचारेल.

# केसगळती थांबवण्यासाठी शेवग्याची पावडर की ज्यूस? जाणून घ्या लांबसडक केसांचे जबरदस्त ब्यूटी सिक्रेट!



कितीही काही केलं तरी केसगळती काही थांबत नाही. महागडे तेल, शाम्पू वापरुन देखील काही उपयोग होत नाही. आपलेही केस लांबसडक- घनदाट असावे असं प्रत्येकाला वाटतं पण वाढते प्रदूषण, चुकीचा आहार यामुळे केसांच्या वाढीवर परिणाम होतो सतत टाळू कोरडी किंवा अतिप्रमाणात चिकट झाल्याने केसगळती वाढते. केसांची योग्य निगा न राखल्यास केसांना फाटे फुटतात. केसगळती रोखण्यासाठी आपण महागडे ब्यूटी ट्रिटमेंट्स देखील करतो. पण त्याचा केसांवर चुकीचा परिणाम होतो. बदलता आहार, प्रदूषण, कमी झोप, स्ट्रेस आणि केमिकलयुक्त उत्पादने यामुळे केसांचं नैसर्गिक सौंदर्य हरवून जातं. पण या समस्यांवर एकच नैसर्गिक उपाय तो म्हणजे शेवगा. शेवग्याला आयुर्वेदात बहुगुणी म्हटलं जातं. यात व्हिटॅमिन ए, सी आणि ई आहे. झिंक आणि प्रोटीनचे देखील मुबलक प्रमाण आहे. हे घटक केसांच्या मुळांना बळकटी देतात. केसांची नव्याने वाढ करण्यास सुरुवात करतात. पण नेमकं केसांसाठी शेवग्याचा पावडर की, ज्यूस काय फायदेशीर आहे, जाणून घेऊया.

शेवग्यामध्ये व्हिटॅमिन ए असते जे टाळूला ओलावा देते, कोंडा आणि कोरडेपणा दूर करण्यास मदत करते. याचे गुणधर्म कोलेजन तयार करण्यास मदत करतात. जे केसांना मजबूत करते. जर आपल्याकडे खूप वेळ नसेल तर ज्यूसऐवजी आपण शेवग्याचा पावडर वापरु शकतो. ही पावडर सुकवलेल्या शेवग्याच्या पानांपासून बनवली जाते.सकाळी एक चमचा शेवग्याची

# दात आणि हिरड्या निरोगी ठेवू



निरोगी राहण्यासाठी शारीरिक आणि मानसिक आरोग्यासोबतच तोंडाच्या आरोग्याची काळजी घेणं अत्यंत आवश्यक आहे. आपले दात केवळ आपल्या आरोग्यावरच परिणाम करत नाहीत तर आपलं सौंदर्य वाढवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात. पण कधी कधी काही कारणानं आपले दात आणि हिरड्या अनेक समस्यांनी ग्रस्त होतात. यामुळं आपल्याला समस्यांना सामोरं जावं लागतेच, तर अनेक वेळा आपण उघडपणे हसायलाही लाजतो. अशा परिस्थितीत दात आणि हिरड्यांची काळजी घेण्यासाठी महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणं आवश्यक आहे. तुमच्या तोंडाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी काही टिप्स जाणून घ्या.

संतुलित आहार घ्या : तोंडी आरोग्य राखण्यासाठी संतुलित आहार दिनचर्या तयार करणं महत्वाचं आहे. कॅल्शियम आणि फॉस्फरस दातांच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहेत. अशा परिस्थितीत दुग्धजन्य पदार्थ, भाज्या, नट आणि मासे इत्यादींचा आहारात सम ावेश करावा. तसेच साखरयुक्त आणि आम्लयुक्त पदार्थ टाळा, कारण ते दात किडतात.

हायड्रेटेड राहणं : आपण दिवसभर विविध गोष्टी खातो, त्यातील लहान कण आपल्या दातांमध्ये अडकतात. हे कण दातांमध्ये अडकून किडतात. अशा परिस्थितीत ते टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिणे महत्वाचे आहे. पिण्याचे पाणी अन्नाचे कण, बॅक्टेरिया आणि आम्ल धुण्यास मदत करते ज्यामुळे दात किडतात.

टूथब्रश वापरणे : निरोगी दात आणि हिरड्यांसाठी, चांगली तोंडी स्वच्छता राखणे महत्वाचे आहे. यासाठी दिवसातून किमान दोनदा दात घासावेत. मऊ ब्रिस्टल टूथब्रश वापरा आणि अन्नाचे कण काढून टाकण्यासाठी दातांमध्ये आणि हिरड्यांम धून फ्लॉस करण्याचे सुनिश्चित करा.

नियमित तपासणी करा : आपले दात निरोगी ठेवण्यासाठी, आपण ते केवळ स्वच्छच नाही तर त्यांची नियमित तपासणी करणे देखील महत्त्वाचे आहे. वेळोवेळी दातांची तपासणी केल्यास कोणत्याही समस्या लवकर ओळखता येतात ज्यामुळे योग्य उपचार होण्यास मदत होते. फ्लोराईड उत्पादने वापरा : फ्लोराइड हे एक खनिज आहे जे दात मुलामा चढवणे मजबूत करते आणि त्याचे नुकसान होण्यापासून संरक्षण करते. यासाठी फ्लोराईड टूथपेस्ट आणि माउथवॉशची निवड करा आणि तुम्ही तुमच्या दंतवैद्याच्या सल्ल्यानुसार फ्लोराईड उपचार देखील घेऊ शकता.

# केस पातळ होत आहेत हा घरगुती उपाय बनवेल केशवती



सुंदर केस गळताना पाहणे खूप त्रासदायक वाटते. केस पातळ होण्याची अनेक कारणं असू शकतात. अस्वास्थ्यकर जीवनशैली, हार्मोनल असंतुलन, आनुवंशिकता यामुळंही केस गळण्याची समस्या निर्माण होते. केस मजबूत करण्यासाठी अनेक घरगुती उपाय आहेत. हे घरगुती उपाय तुमच्या केसांसाठी जादूचं काम करू शकतात. चला तर मग विलंब न लावता जाणून घेऊया केस गळणं कसं टाळता येईल.

कोरफडीचा वापर : कोरफडीच्या वापरानं केस मजबूत होतात. यासाठी एका डब्यात २ चमचे एलोवेरा जेल घ्या. या जेलनं तुमच्या टाळूवर बोटांनी मसाज करा. मसाज केल्यानंतर ते सुमारे २५ मिनिटं राहू द्या आणि नंतर कोमट पाण्यानं धुवा. तुम्ही हे आठवड्यातून दोनदा करू शकता. हे तुमचे केस मुळापासून मजबूत करेल.

अंडी: केसांचे पातळ होण्यासाठी अंड्यांचा वापर केला जाऊ शकतो. यासाठी एका भांड्यात अंडे फोडून त्यात ऑलिव्ह ऑईल मिसळा. आता हे मिश्रण केसांना लावा. सुमारे २० मिनिटांनंतर आपले केस शॅम्पूने धुवा. आपण आठवड्यातून १-२ वेळा ही प्रक्रिया करू शकता

एवोकॅडो: केसांच्या वाढीसाठी एवोकॅडो खूप फायदेशीर ठरू शकतो. यासाठी एका भांड्यात एवोकॅडो आणि केळी मॅश करा. हे मिश्रण तुमच्या टाळूवर आणि केसांना लावा. सुमारे ३० मिनिटांनंतर पाण्याने स्वच्छ धुवा. हे तुमचे केस मजबूत करते

आवळा आणि लिंबाचा रस: आवळा आणि लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी आढळते. जे केसांसाठी खूप फायदेशीर आहे. त्याची गुळगुळीत पेस्ट बनवा नंतर केसांना लावा. कोरडे झाल्यानंतर केस थंड पाण्याने धुवा. कडुलिंबाची पाने : कडुलिंबाची पाने केसांसाठीही फायदेशीर ठरू शकतात. त्यांचा वापर करून तुम्ही कोंडा, केस गळणे इत्यादीपासून मुक्त होऊ शकता. केसांवर वापरण्यासाठी, प्रथम कडुलिंबाची पाने धुवा, आता त्याची पेस्ट तयार करा, नंतर केसांना लावा. सुमारे ३० मिनिटांनंतर स्वच्छ धुवा.

मेथी दाणे : मेथी दाणे केसांसाठीही फायदेशीर असतात. ते केस गळणे थांबवतात. यासाठी रात्री मेथीचे दाणे पाण्यात भिजत ठेवा. सकाळी बिया पाण्यात मिसळून घट्ट पेस्ट बनवा. हे मिश्रण केसांवर आणि टाळूवर लावा आणि ३० मिनिटे राहू द्या. शॅम्पूने धुवा.

# बायकोचे ऐकणारा नवराच सुखी आणि यशस्वी होतो; अभ्यासात मोठा खुलासा



नवरा बायको म्हणजे संसाराची दोन चाके. नवरा बायको एकमेकांना जितकं जास्त प्रेम करतील, एकमेकांची जितकी जास्त काळजी घेतील आणि एकमेकांना जपतील तेवढा त्यांचा संसार सुखाचा होतो असं बोललं जातं. नात्यातील गोडवा टिकला तरच ते नातं टिकतं हे सुद्धा तितकच खर आहे.. काही घरांमध्ये नवरा त्याच्या बायकोचे इतकं ऐकतो की त्याला घरातील इतर लोकांचे टोमणे ऐकावे लागतात. हा बघा सगळं बायकोच ऐकतोय हे सातत्याने सहन करावा लागते मात्र आता एका अभ्यासानुसार, जो नवरा आपल्या बायकोचे सगळं काही ऐक तोच नवरा सुखी आयुष्य जगतो. समाधानात त्याचा संसार वाढतो असं समोर आलं आहे.

अमेरिकेतील द गॉटमन इन्स्टिट्यूटचे प्रमुख संशोधक डॉ. जॉन गॉटमन यांनी आनंदी आणि अखंड विवाहाच्या वैशिष्ट्यांचा वर्षानुवर्षे अभ्यास केल्यानंतर त्यांना याबाबत माहिती समोर आली. नवरा बायकोच्या नात्याबद्दल गॉटमन यांनी असं एक सत्य उघड केले जे नवविवाहित पुरुषांसाठी खरोखर उपयुक्त ठरेल. सुखी संसारासाठी गॉटमन यांनी एकच सल्ला दिला आहे, तो म्हणजे तुमच्या पत्नीला आनंदी ठेवा! पुरुषांनी त्यांच्या पत्नींचे ऐकावे आणि व्यावसायिक करिअर मध्ये सक्रिय भूमिका घ्यायला लावावी असं गॉटमन यांनी सांगितलं आहे.

गॉटमन सल्ला देतात की पुरुषांनी त्यांच्या पत्नींच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडण्याबाबत सहमत असले पाहिजे.. आपल्या पत्नीला कधीही कोणत्या गोष्टीसाठी विरोध करू नये. बहुतेकदा असे घडते की जे पुरुष आपल्या पत्नींच्या प्रभावाचा प्रतिकार करतात ते त्यांना कळत नकळत असे करतात. हे घडते, आणि ते ठीक आहे, परंतु प्रभाव कसा स्वीकारायचा हे शिकण्याची वेळ आली आहे. ''तुमच्या जोडीदाराकडे दररोज लक्ष देऊन आणि त्यांना पाठिंबा देऊन ही एक मानसिकता आणि कौशल्य दोन्ही विकसित होते, डॉक्टरांनी असेही स्पष्ट केलं की भावनिकदृष्ट्या मोठ्या मनाचा नवरा आपल्या बायकोचा प्रभाव स्वीकारण्याची शक्यता जास्त असते . आणि तो तिला अधिक चांगल्या प्रकारे मदत करू शकतो. कारण कोणतीही भावना व्यक्त करण्यात त्याला संकोच वाटत नाही.

गॉटमनच्या नातेसंबंधांवरील अभ्यासाचे निष्कर्ष पाहून अनेक महिलांनी आनंद व्यक्त करत सोशल मीडियावर वेगवेगळ्या पोस्ट केल्या. एका महिलेने तिच्या नवऱ्याला टॅग करत म्हंटल, आनंदाची हमी मी जे सांगतो ते करत राहा!.. तर ''तुला हजारवे वेळा टॅग करत आहे हे अनुसरण करण्याची आशा आहे, असं म्हणत दुसऱ्या एका महिलेने तिचं नवऱ्याची फिरकी घेतली.

# कोलेस्टेरॉलचा वाढणारा धोका टाळा, शरीर आणि त्वचेवर होणारे बदल वेळीच ओळखा...

सध्याच्या वेगवान जीवनशैलीत सगळेच जण अरबटचरबट खात असतात. या सवयीमुळे शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढत चालेल आहे. या वाढत्या कोलेस्टेरॉलमुळे नवीन समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. डोकेदुखी आणि छातीत दुखणे हेच फक्त कोलेस्टेरॉलचे संकेत नसतात. तर तुमची त्वचा सुद्धा कोलेस्टेरॉल मोठा संकेत आहे.

त्वचेवरही कोलेस्टेरॉलचा परिणाम होतो. त्याची लक्षणे वेळीच ओळखा आणि गंभीर हृदयविकार टाळा. तुमचा कोलेस्टेरॉल किती प्रमाणात वाढले आहे हे बघण्यासाठी पुढील ५ लक्षणे जाणून घ्या.

१. झॅन्थेलाझ्मा

झॅन्थेलाझ्मा म्हणजे डोळ्यांभोवती आलेले पिवळे डाग. डोळ्यांभोवती वा पापण्यांवर लहान पिवळे डाग दिसू लागले तर कोलेस्टेरॉल वाढत आहे हे समजून घ्या. झॅन्थेलाझ्मा हे रक्तात कोलेस्टेरॉल जास्त प्रमाणात आहे असे सुचवतो. आणि



हृदयाच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो.

२. झेंथोमा

झेंथोमा म्हणजे शरीरावर पिवळसर लहान गाठी दिसतात. जास्त चरबी वाढल्याने या गाठी तयार होतात. कोपर, गुढघे, हात आणि पायावर जास्त वेळा या गाठी दिसून येतात.

३. बॅड कोलेस्टेरॉल

बॅड कोलेस्टेरॉल म्हणजे त्वचेची खाज आणि जळजळ होणे. शरीरावर खाज आणि लालसरपणा जाणवत असेल तर ही बॅड कोलेस्टेरॉलची लक्षणे आहेत.

४. पाय थंड पडणे

धमन्यांतील कोलेस्टेरॉल वाढले की रक्तप्रवाहाचा वेग मंदावतो. यामुळे पाय थंड पडतात.

५. नख आणि त्वचेच्या रंगांमध्ये बदल कोलेस्टेरॉल वाढले की रक्त शुद्ध होण्याची प्रक्रिया मंदावते. यामुळे शरीरातील अनेक अवयवांना वेळेत शुद्ध रक्त मिळत नाही. नखं निस्तेज होतात, पिवळी पडतात. त्वचाविकारांचा धोका वाढतो.

कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी काय खावे ?

१. तळलेले तेलकट खाणे टाळा. भाज्या , पालेभाज्या, फळ , फायबर आणि प्रथिने युक्त आहार घ्या

२. किमान ३० मिनिटे व्यायाम करा.

३. धूम्रपान आणि मद्यपान करू नका

४. नियमित रक्त तपासत राहा आणि कोलेस्टेरॉलचीही तपासणी करत राहा

# दिवाळी आलीये, कमी वेळेत घर करा चकाचक!



मुंबई : सण असो वा रोजची साफसफाई, घर स्वच्छ ठेवल्याने सकारात्मकता आणि उत्साह येतो. बाजारातील महागड्या उत्पादनांऐवजी, तुम्ही घरगुती आणि नैसर्गिक वस्तूंनीही कमी वेळेत प्रभावी स्वच्छता करू शकता. खालील काही सोप्या आणि जबरदस्त ट्रिक वापरून तुमचे घर नव्यासारखे चमकदार दिसेल.

१. चिकट व हट्टी डागांसाठी नैसर्गिक उपाय

स्वयंपाकघरातील ओटा सिंक आणि बाथरूमच्या टाईल्सवरील चिकटपणा काढण्यासाठी हे मिश्रण जादूचं काम करतं.लिंबू (ङशोप) आणि बेकिंग सोडा (इरज्ञळपस डेवर): लिंबाचा रस आणि बेकिंग सोडा एकत्र करून जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट चिकट डागांवर किंवा गंजलेल्या नळांवर लावा. काही मिनिटांनी स्क्रब करून स्वच्छ पाण्याने धुवा. लिंबातील सिड आणि सोड्यामुळे डाग लगेच निघून जातात. आल्याची पावडर, व्हिनेगर आणि बेकिंग सोडा एकत्र करून पेस्ट बनवा. यामुळे वॉश बेसिन आणि ड्रेनमधील चिकटपणा व हट्टी डाग सहज निघतात.२. पंखे आणि खिडक्यांसाठी सोपे हॅक्स

पंख्याची धूळ आणि खिडक्यांचे काच साफ करणे हे सर्वात त्रासदायक काम असते. पंखा स्वच्छ करण्यासाठी 'पिलो कव्हर' हॅक: पंख्याचे प्रत्येक पाते एका जुन्या उशीच्या कव्हरमध्ये घाला आणि हळू हळू बाहेरून आतल्या बाजूला पुसा. यामुळे पंख्यावरील सर्व धूळ थेट कव्हरमध्ये जमा होईल आणि तुमच्या घरात खाली पडणार नाही.काचेसाठी व्हिनेगर स्प्रे: पाणी आणि व्हाईट व्हिनेगर सम प्रमाणात मिसळून स्प्रे बॉटलमध्ये भरा. हा स्प्रे खिडक्या आणि आरशांवर वापरा. मायक्रोफायबर कापडाने पुसल्यास काच लख्ख चमकते.

३. फर्निचर आणि फरशीची चमक टिकवा

फरशीसाठी व्हिनेगर: फरशी पुसताना पाण्यात थोडे व्हिनेगर आणि डिटर्जंट मिसळा. यामुळे जमिनीवरचे डाग निघून जातात आणि फरशीला चांगली चमक येते. लाकडी फर्निचरसाठी तेल: लाकडी फर्निचर पुसण्यासाठी नारळाचे तेल (उेलेपीीं जळश्र) किंवा ऑलिव्ह ऑइल आणि लिंबाच्या रसाचे मिश्रण वापरा. यामुळे लाकडी वस्तूंची नैसर्गिक चमक टिकून राहते. कारपेटसाठी शेव्हिंग क्रीम: कार्पेटवरील डाग काढण्यासाठी त्यावर शेव्हिंग क्रीम लावा आणि काही वेळाने कापडाने पुसून काढा.४. वस्तू कमी करा

साफसफाईला सुरुवात करण्यापूर्वी घरात साचलेल्या अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावा.जुने सामान बाहेर काढा: तुटलेला आरसा, खराब झालेले बूट, न वापरलेले जुने कपडे, गंजलेल्या वस्तू आणि वापरात नसलेले जुने फर्निचर घराबाहेर काढून टाका. घरात पसारा कमी झाल्यास साफसफाईचे काम आपोआप सोपे होते आणि घरात सकारात्मक ऊर्जा येते. कपडे आणि सामान व्यवस्थापन: वापरात नसलेले कपडे आणि इतर सामान दान करा किंवा त्यांची योग्य जागी मांडणी करा. यामुळे घर नेहमी व्यवस्थित आणि नेटके दिसते.

# ग्रंथ हेच आपल्या आयुष्यातील खरे गुरू


**वैभववाडी : मंदार सदाशिव चोरगे**

**ग्रंथ कोंडून ठेवू नका, कपाटात सुरक्षित... जिथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते, कपाटाच्या कबरीत गाडले जातात विचारांचे मुडदे. वाचनालय असते एक बाग न कोमेजणाऱ्या असंख्य फुलांनी बहरलेली...**

अलीकडे वाचनाची आवड कमी होऊ लागली आहे असे अनेकजण म्हणतात, ते थोडेफार खरे असले तरी दूरदर्शनमुळे वाचण्याऐवजी ऐकण्यात आणि पाहण्यातच अनेकांचे मन गुरफटून जाते. असे असले तरी केवळ प्रेक्षक वा श्रोता होण्याने सर्वांच्या मनाची भूक भागत नाही. एकदा लहानपणी पुस्तकांशी मैत्री झाली की, ती संगत कधी सुटत नाही. जीवनातले अनुभव अधिक डोळसपणे देण्याची शक्ती पुस्तक आपल्याला देतात. आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण संपन्न करतात. 'वाचनालयाविना शाळा म्हणजे शस्त्रागाराविना किल्ला होय' पूर्वीच्या काळी देशाभिमानाने प्रेरित होऊन समाज शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली ही ग्रंथालये म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची व जागृतीची प्रतीकेच आहेत. 'पुस्तक वाचल्यावर मस्तक तयार होतं आणि मस्तक तयार झाल्यावर माणूस कुठेही नतमस्तक होत नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. आज विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक तथा समाजातील सर्वच घटकांचे वाचन कमी होत आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. वाचनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक गोष्टी सहाय्यभूत ठरतात. हे जवळपास प्रत्येक यशस्वी क्षेत्रातील तज्ज्ञ तथा अनुभवी व्यक्तींचे मत आहे. आज विद्यार्थी वर्ग केवळ मिळेल त्या साधनांद्वारे फक्त माहिती गोळा करीत आहे. अभ्यासक्रमाशी पूरक असणाऱ्या उपयुक्त वाचनाकडे अनेकांचा कल आहे; परंतु मूळ कलाकृतीचा अभ्यास करण्याकडे, वाचन वाढवण्याकडे अनेकांचे दुर्लक्ष होत आहे. देशाला महासत्ता बनवण्याचे ज्यांनी प्रथम स्वप्न पाहिले ते आपले राष्ट्रपती भारतरत्न भारताचे मिसाईल मॅन डॉक्टर ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनाच्या रूपात आज सर्वत्र सर्व शाळांमध्ये साजरा करण्यात येतो; परंतु हा एक दिवसाचा कार्यक्रम न राहता त्यात सातत्य राहणे गरजेचे आहे.

'वाचाल तर वाचाल, ग्रंथ हेच गुरू, पुस्तक मस्तक घडवतात, प्रसंगी अखंडित वाचीत जावे अशी अनेक वाक्य कानावर येतात. पण कोण लक्षात घेतो? मोबाइल, इंटरनेटच्या जमान्यात वाचन दुर्लक्षित झाले का? अन् असेल तर तो खजिना आजच्या विद्यार्थ्यांना कसा उपलब्ध करून देता येईल. आज जे काही विद्यार्थ्यांकडून वाचले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकांमधीलच. शिक्षक आपले अभ्यासक्रमामध्ये, तर विद्यार्थी त्यांच्या परीक्षेच्या अभ्यासात गुंग, कुणालाच दोष देता येणार नाही. पण जेवण जसे चौरस असावं तसं वाचन देखील चौफेर असावे. सार्वजनिक तसेच महापालिकेची वाचनालये आज ओस पडत असल्याचे दिसते.

ज्येष्ठ नागरिक सोडता तरुणांनी वाचनालयाकडे पाठ फिरवली आहे. हा सोशल मीडियाचा परिणाम आहे. काही ठिकाणी वाचक आहेत पण वाचनालयात दर्जे



दार पुस्तके, साहित्य ग्रंथ, उपलब्ध नाहीत. बऱ्याच वेळा भरमसाट पुस्तके प्रसिद्ध होतात. त्यातील ठरावीक पुस्तकांची विक्री होते मग वाचन कमी झाले अशी ओरड सुरू होते. या ओरडण्याला तसा अर्थ नाही. हा निराशावादी दृष्टिकोन आहे. असे मला वाटते वाचनाचे अनेक पर्याय सध्या आपल्याकडे आलेले आहेत. पारंपरिक छापील पुस्तकांबरोबर आधुनिक अशा ई-बुक सारख्या पुस्तकांमुळे पुस्तकांचे विश्व अधिकच रुंदावले आहे. किंबहुना यामध्ये रोजच भर पडत आहे. आधुनिक साधनांमुळे कमी जागेत, कमी खर्चात जास्त संख्येने पुस्तकं साठवली जातात. आज ऑनलाईन पुस्तकांच्या माध्यमातून अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. विविध पुस्तकांवर भरपूर सूट, प्रदर्शन व ऑनलाइन विक्रीमध्ये मिळत असल्याने वाचक पुस्तक खरेदी करणे पसंत करत आहेत. सध्या वाचकांच्या घरी स्वतःची छोटी छोटी वाचनालये उदयास येत आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्या वाचन संस्कृतीने आपल्या पारंपरिक ढाचा बदलून नवा ढाचा तयार केला आहे. जोपर्यंत मानवाला ज्ञानलालसा आहे तोपर्यंत वाचन संस्कृती लयास जाणे कदापिही शक्य नाही. आताचे जग ऑनलाइन वाचनालयाचे आहे. विविध लेखकांचे ब्लॉग, विविध लेख, पेज, ई-पेपर याद्वारे लेखन वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. विविध ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ स्वरूपात उपलब्ध पुस्तके मोबाइलवर उपलब्ध आहेत.

यामुळे वाचनालय आपल्या सदैव सोबती अशा परिस्थितीमुळे ग्रामीण व शहरी भागातील वाचनालये सुनी सुनी झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. दुसरीकडे मात्र आजही मुंबई-पुणे यांसारख्या शहरात लोकल ट्रेन, एसटी यामध्ये पुस्तके वाचणारी अनेक मंडळी आपल्याला निदर्शनास पडतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त एसटी बसमध्ये वाचनालयाची संकल्पना सध्या पाहायला मिळते. त्याशिवाय पुस्तकांचे गाव भिलार ही याची आदर्श उदाहरणे सांगण्यात येतील.

सध्याचे पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालणे पसंत करतात. त्यामुळे मराठी विषयाची आवड नसल्याने मराठी वाचनालयाकडे त्यांनी पाठ फिरवली आहे. दुर्दैवाने आपली मराठी अन्य भाषेच्या तुलनेत काहीशी मागे पडत आहे. ती पुढे येणे गरजेचे आहे. आजच्या इंटरनेटच्या आभासी युगात वाचनासाठी उसंत थोडीफार कमी झाली आहे. मोबाइल, फेसबुक, व्हॉट्सॲप विविध मनोरंजनात्मक गेम्स, टीव्हीचे शेकडो चॅनल्स यामुळे मनोरंजनाची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. यातून साहित्याची गरज संपुष्टात येईल का?

या प्रश्नाचे उत्तर देताना ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोतोपल्लींनी म्हटलंय... उद्या विज्ञान तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या गुंतागुंतीतून सुटकेच्या धडपडीसाठी उन्नत अर्थव्यवस्थेने कोंडलेल्या श्वासाला विरोध करण्यासाठी निर्मळ जगण्यास शेवटी माणसाला साहित्याच्या आश्रयाला यावे लागणार. दुसरा आश्रय कोणता असणार आहे. गुगलमुळे पडलेल्या प्रश्नांना क्षणात उत्तर शोधणे सोपे झाल्यामुळे चिकित्सा व चिकिस्तकवृत्ती कमी झाली आहे. गेल्या काही वर्षांत रेडिओ, इंटरनेट, दूरचित्रवाणीचा विकास आणि वापर झपाट्याने वाढला पण वृत्तपत्रे आणि पुस्तकांना जगातून हद्दपार करण्यात माध्यमांना यश आलेले नाही, रेडिओद्वारे ऐकू येणारे शब्द व दूरचित्रवाणीवरील चित्रे यांचा मनावर तत्काळ परिणाम होतो पण तो वरवरचा असतो टिकाऊ नसतो. आजही कमी खर्चाचे व चटकन उपलब्ध होणारे ज्ञानाचे साधन म्हणजे पुस्तकेच आहेत. पुस्तके वाचून मोठमोठ्या चळवळी उभ्या केलेल्या व्यक्ती वर्तमानकाळात सुद्धा आपल्यासमोर आहेत. साहित्य संमेलन, प्रबोधनवादी मेळावे यात पुस्तकांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होतच असते व आजही अनेक पुस्तके जन्माला येत आहेत. त्यांचा वेग मंदावलेला नाही यावरून जरी वाचनालय सुनी सुनी झाली तरी वाचन कमी झालेले नाही हे लक्षात येते. आजच्या काळात 'वाचाल तर वाचाल' हे बाबासाहेबांचे शब्द सार्थ वाटतात व अनेक वेळा मार्गदर्शक ठरतात. सध्या प्राथमिक शिक्षण स्तरावर विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, क्षमता विकसित करण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम देखील शासनाने हाती घेतले आहेत. आपणही सर्वांनी एक पाऊल पुढे टाकत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नियमित वाचन करणे गरजेचे आहे.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे? डॉक्टर टीप्स



दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल आणि डॉक्टरपासून दूर राहायचं असेल, तर शरीराकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

कॅल्शियम, लोह गरजेचं शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी काही बाबी लक्षात घेणं गरजेचं आहे. कॅल्शियम आणि लोहाची शरीराला आवश्यकता असते. कॅल्शियम आणि लोहाच्या कमतरतेमुळे तुम्हाला चालता-फिरताना त्रास होऊ शकतो

## विनोद




काटा -

बंडू - खंडू, काल माझ्या स्वप्नात माझ्या पायाला एक काटा टोचला.

खंडू - आजपासून पायात चप्पल घालून झोपत जा.

## संदेश

Santa: Ye Nya Mobile Kab Liya?

Banta: Liya Nai.. Girlfriend Ka Uthaya Hai

Santa: Kiyun?

Banta: Wo Roz Kehti thi Ke Tum Mera Phon Nhi Uthate...

## सुविचार



ज्याला नीट खायला प्यायला मिळते, त्याने आपले कर्तव्यही चोख बजावावे.

-थॉमस फुलर

### संस्कृत सुभाषित


एकोदरसमुद्भूता एकनक्षत्रजातकाः ।

न भवान्ति समाः शील यथा बदरिकाष्टकाः ॥

अर्थ : एकाच बोराच्या झाडावर उत्पन्न झालेले काटे एक दुसऱ्यासारखे नसतात तसेच एका आईच्या पोटी जन्मलेले, एकाच नक्षत्रावर जन्मलेले सर्व लोक समान नसतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. १



## आडवे शब्द

१. करमणूक करणारे
४. चाणक्यनीती
१०. आरक्षित
११. मुसळधार पावसाचे नक्षत्र
१२. पक्षीराज
१३. चांदी
१५. टक्कर
१७. केशतेलातील सुगंधी वनस्पती
१८. हार, सर
२१. इतरांहून निराळी
२३. अनेक प्रकारची फळे
२६. फळांचे शेत
२७. भांडण
२८. कमीजबरोबरचे वस्त्र
३०. रेशमाचे जाडसर कापड
३२. स्वच्छ कारभार!
३४. नमन
३५. विशेष
३६. दयाळू
३७. निरर्थक
३९. पळून जाणे
४१. खाजणारा
४२. ओढ्यावरील तात्पुरता पूल
४४. भूतकाळ
४६. अत्तराचा बोळा
४८. अधिक महिना
५१. नृत्य-नाट्यकलेचे दैवत
५४. निराश, अनुत्साही
५५. नेम, व्रत
५७. उत्सवाचे दिवस
५८. पुष्कळ (ग्रा.)
५९. नमुनेदार
६२. ताबा, बळजबरीने अंमल
६३. दुसऱ्याच्या अंमलाखाली असलेला
६४. लहान मूल
६५. भोळा शंकर
६७. हिंमत
६९. किंचित वक्रता
७०. वेतन, ७१. बातमी
७२. चिंतन, ७३. आणि
७४. उद्देश, नेम
७५. हिंदीत पोस्ट ऑफिस

## उभे शब्द

१. सुंदर स्त्री
२. रंगविलेले
३. भयानक, भयंकर
४. दक्ष
५. जळजळीत, उष्ण
६. झकास
७. वाघाची ललकारी
८. मेहनत, श्रम, त्रास
९. बटबटीत, आगखाऊ
१४. त्रागा, राग, संतापणे
१६. एक छोटे चर्मवाद्य
१७. पत्ता, शोध
१९. मराठीत 'सॉरी'!
२०. निकट, आजूबाजूस
२२. गतिमान
२४. दाखविणे
२५. मनातील इच्छा, बेत
२७. वाद्य वाजविणारा
२९. रम्य
३१. सज्जनगडचे संत
३३. सैनिकांची परेड, व्यायाम
३५. आचारी
३७. बकरा, बोकड
३८. प्राण
३९. सैन्याची तुकडी
४०. फायदा
४१. गैरहजेरी, कामावर बुट्टी
४३. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
४५. लोखंड घासण्याचे हत्यार
४७. वेदना
४९. फोडातील द्रव
५०. हांजी हांजी करणारे वरिष्ठांनी 'बैल गाभणा' म्हटल्यावर '--- महिना' म्हणण्यास मागेपुढे पाहत नाहीत!
५२. पोपट
५३. चकचकीत
५४. प्रसिद्ध शायर- --- खय्याम
५६. शिर्डीचे संत
५९. सन्मानाचे वेतन
६०. गोष्टी लिहिणारा
६१. आवाजांचा गोंधळ
६३. उद्याच्या नंतरचा दिवस
६५. मूळ बांधकाम
६६. आघात, घाव
६८. अंतःकरण

## आडवे उत्तर


१.मनोरंजक ४.साम दाम दंड भेद
१०.राखीव ११.हस्त १२.गरुड
१३.रजत १५.धडक १७.माका
१८.माळ २१.आगळीवेगळी
२३.फळ फळावळ २६.मळा
२७.वाद २८.सलवार ३०.टसर
३२.पारदर्शक ३४.नमस्कार
३५.खास ३६.कनवाळू
३७.अर्थहीन ३९.पलायन ४१.खाजरा
४२.साकव ४४.गतकाल
४६.फाया ४८.मालमास ५१.नटराज
५४.उदास ५५.रसा ५७.सणवार
५८.मस ५९.मासलेवाईक ६२.कब्जा ६३.परस्वाधीन
६४.बालक ६५.सांब ६७.धमक
६९.बाक ७०.पगार ७१.वार्ता ७२.मनन ७३.व
७४.लक्ष्य ७५.डाकघर

## उभे उत्तर

१.मनोरमा २.रंगीत ३.कराल
४.सावध ५.दाहक ६.मस्त
७.डरकाळी ८.दगदग ९.भडक
१४.जळफळाट १६.डफ
१७.मागमूस
१९.माफ कर २०.जवळपास
२२.वेगवान २४.प्रदर्शन २५.मनोरथ
२७.वादक २९.रमणीय
३१.समर्थ रामदास स्वामी ३३.कवायत
३५.खानसामा
३७.अज ३८.जीव ३९.फलटण
४०.नफा ४१.खाडा ४३.कसकस
४५.कानस ४७.यातना ४९.लस
५०.नववा ५२.रावा ५३.जरकबरक
५४.उमर ५६.साईबाबा ५९.मानधन
६०.लेखक ६१.कलकल ६३.परवा
६५.सांगाडा ६६.प्रहार ६८.मन



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### फेल तेव्हाच होता जेव्हा...', निवृत्ती की विश्वचषकाची तयारी?



मुंबई -विराट कोहलीने १६ ऑक्टोबर रोजी एक्स (माजी ट्विटर) वर एक अशी पोस्ट शेअर केली, ज्यानंतर फॅन्समध्ये खळबळ उडाली आहे. त्या एका वाक्यावरून चाहते वेगवेगळे अर्थ काढत आहेत की, काहींना वाटते कोहली निवृत्तीच्या तयारीत आहे, तर काही म्हणतात हा २०२७ वर्ल्ड कपसाठीचा सिग्नल आहे.ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी कोहलीने एक्स वर लिहिले की, ''तुम्ही खरंच तेव्हाच फेल होता, जेव्हा तुम्ही हार मानायचे ठरवता.'' हे पोस्ट काही मिनिटांत व्हायरल झाले आणि लगेचच चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आले. कुणी म्हणाले ''रिटायरमेंटचा हिंट आहे'', तर कोहलीचे चाहते म्हणाले ''किंग अजून संपलेला नाही, तो २०२७ वर्ल्ड कपसाठी सज्ज आहे.''

***


### सामन्याच्या दोन दिवस आधीच प्लेइंग ११ जाहीर

**क्राईस्टचच**-गेल्या महिन्यात इंग्लंड क्रिकेट संघानं आयर्लंडला तीन सामन्यांच्या मालिकेत २-० ने हरवले होते. आता, इंग्लंडचा संघ न्यूझीलंडच्या आव्हानाचा सामना करण्यास सज्ज आहे. तीन साम न्यांची टी-२० मालिका १८ ऑक्टोबर रोजी न्यूझीलंडच्या भूमीवर सुरु होईल. दोन्ही संघांमधील पहिला टी-२० सामना क्राइस्टचर्चम धील हॅगली ओव्हल इथे खेळला जाईल. सामना अजून दोन दिवस दूर आहे, परंतु इंग्लंडने १६ ऑक्टोबर रोजी त्यांच्या प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे.संघात चार विकेटकीपरचा समावेश : पहिल्या टी-२० साठी इंग्लंडने जाहीर केलेल्या संघातील सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे चार विकेटकीपिंग पर्यायांचा समावेश.

***

### पाकिस्तान नवा कॅप्टन निवडणार, या खेळाडूच्या नावाची चर्चा

**कराची**-पाकिस्तान क्रिकेट संघानं दक्षिण आफ्रिकेवर ९३ धावांनी कसोटी सामन्यात विजय मिळवला आहे. मात्र, पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठ्या घडामोडी सुरु आहेत. आशिया कपमध्ये पाकिस्तानचा भारतानं सलग तीन वेळा पराभव केला होता. या पराभवानंतर पीसीबी आता सलमान आगाचं कर्णधारपद काढून घेणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. सलमान आगाच्या जागी पाकिस्तानच्या टी २० संघाचं कर्णधारपद अनुभवी ऑलराऊंडर शादाब खान याला दिलं जाऊ शकतं. आगामी टी २० मालिकांसाठी शादाब खानला कर्णधार केलं जाण्याची शक्यता आहे.शादाब खान यानं पाकिस्तानकडून ७० एकदिवसीय आणि ११२ टी २० सामने खेळले आहेत.



**

### भारताने धुतल्यानंतर पाकिस्तानच्या टीममध्ये उभी फूट

कराची-आशिया कपमध्ये टीम इंडियाकडून तीनही वेळा पराभव झाल्यानंतर पाकिस्तानच्या टीममध्ये उभी फूट पडल्याचं चित्र आहे. टी-२० फॉरमॅटमध्ये सलमान अली आघाची कॅप्टन्सी जाणार असल्याचं वृत्त समोर आलं आहे. सलमान अली आघाच्या ऐवजी नवा कर्णधार कोण होणार? याचं नावही समोर आलं आहे. पाकिस्तानचा अनुभवी ऑलराऊंडर शादाब खान पाकिस्तानच्या टी-२० टीमचा कर्णधार होऊ शकतो. शादाब खानने आतापर्यंत पाकिस्तानकडून ७० वनडे आणि ११२ टी-२० आंतरराष्ट्रीय मॅच खेळल्या आहेत. खराब कामगिरीनंतर शादाब खानला पाकिस्तानच्या टीममधून बाहेर केलं गेलं होतं.



***

### अभिषेक शर्मा आणि स्मृती मानधनाला आयसीसी प्लेअर्स ऑफ द मंथ पुरस्कार

दुबई-भारतीय क्रिकेटपटू अभिषेक शर्मा आणि स्मृती मानधना यांनी सप्टेंबर २०२५ साठी आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार पटकावला आहे. अभिषेकने पुरुष गटात हा सन्मान मिळवला, तर मानधनाला महिला गटात हा सन्मान मिळाला आहे. अभिषेक शर्माने आशिया कप टी२०आय स्पर्धेत चांगली कामगिरी केली. त्याने सात सामन्यांमध्ये ४४.८५ च्या सरासरीने आणि २०० च्या स्ट्राईक रेटने ३१४ धावा केल्या. या कामगिरीमुळे त्याला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट आणि आयसीसी पुरुष टी२०आय फलंदाजी क्रमवारीत ९३१ चे सर्वोच्च रेटिंग गुण मिळाले. अभिषेकने संघातील सहकारी कुलदीप यादव आणि झिम्बाब्वेच्या ब्रायन बेनेटला मागे टाकून हा पुरस्कार जिंकला. अभिषेक म्हणाला, ''हा पुरस्कार जिंकणे ही एक अद्भुत भावना आहे.

## वर्ल्डकपच्या सेमीफायनलमध्ये पोहोचणारा ऑस्ट्रेलिया पहिला संघ



मुंबई: आयसीसी महिला वर्ल्डकप स्पर्धेतील एका महत्त्वपूर्ण सामन्यात, ऑस्ट्रेलियाने बांगलादेशचा १० गडी राखून पराभव करत सेमीफायनलमधील आपले स्थान निश्चित केले आहे. विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा ऑस्ट्रेलिया पहिला संघ ठरला आहे.

बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी त्यांना मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. बांगलादेशचा संघ ५० षटकांत ९ गडी गमावून १९८ धावा करू शकला.बांगलादेशसाठी शोभना मोस्तरीने सर्वाधिक नाबाद ६६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून अलाना किंग, जॉर्जिया वेअरहॅम, ॲशले गार्डनर आणि ॲनाबेल सदरलँड यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.



**बांगलादेशला केले पराभूत**

१९९ धावांचे माफक लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या ऑस्ट्रेलियन सलामीवीरांनी बांगलादेशी गोलंदाजांना कोणतीही संधी दिली नाही. कर्णधार ॲलिसा हिली आणि फोबी लिचफिल्ड यांनी अप्रतिम फलंदाजी करत संघाला अवघ्या २४.५ षटकांत विजय मिळवून दिला. एलिसा हिली हिने अत्यंत रससीर्शीीळींश फलंदाजी करत आपले सलग दुसरे शतक पूर्ण केले आणि ७७ चेंडूंत नाबाद ११३ धावा केल्या. तिच्या खेळीत २० चौकारांचा समावेश होता.

फोबी लिचफिल्डने देखील तिला उत्कृष्ट साथ दिली आणि ७२ चेंडूंत नाबाद ८४ धावा केल्या. हीली आणि लिचफिल्ड यांच्यातील २०२ धावांची नाबाद सलामी भागीदारी ही महिला विश्वचषकाच्या इतिहासातील गडी न गमावता यशस्वीरित्या गाठलेले सर्वाधिक मोठे लक्ष्य ठरले.

या दणदणीत विजयासह ऑस्ट्रेलियाने विश्वचषकात आपले वर्चस्व कायम राखत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

## ऑस्ट्रेलिया महिला संघ गुणतालिकेत अव्वल



नवी दिल्ली : आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मधील १३व्या लीग सामन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघ आमनेसामने आले. विशाखापट्टणमच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या या रोमांचक लढतीत भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत ४८.५ षटकांत ३३० धावांचा डोंगर उभारला. मात्र, ऑस्ट्रेलियाने जबरदस्त खेळ करत ४९व्या षटकात ७ गडी गमावून हे लक्ष्य पार केले. या विजयासह ऑस्ट्रेलियाने महिला विश्वचषकाच्या पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थान मिळवले असून, भारतीय संघाला पराभवाचा फटका बसला आहे. आता भारताला पहिल्या ४ मध्ये टिकून राहण्यासाठी उर्वरित सामने जिंकणे अत्यावश्यक ठरणार आहे.

ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव करून इतिहास रचल्यानंतर ऑस्ट्रेलिया महिला संघ वर्ल्ड कपच्या गुणतालिकेत पहिल्या स्थानावर पोहोचला आहे. कंगारू संघाने आतापर्यंत ४ सामने खेळले असून, त्यापैकी ३ सामने जिंकले आणि १ सामना पावसामुळे रद्द झाला. त्याचे एकूण ७ गुण आणि +१.३५३ नेट रनरेट आहे. दुसर्या क्रमांकावर इंग्लंडची महिला टीम आहे, जिने ३ सामन्यांत ३ विजय मिळवले असून त्यांचा नेट रनरेट +१.८६४ आहे. भारतीय महिला संघ पराभवानंतर तिसर्या क्रमांकावर कायम आहे, पण त्यांचा नेट रनरेट घसरला आहे. टीम इंडियाने ४ सामने खेळले असून त्यापैकी २ जिंकले आणि २ हरले आहेत. भारताचा सध्याचा नेट रनरेट +०.६८२ आहे. चौथ्या स्थानावर दक्षिण आफ्रिकेचा संघ आहे, ज्यांनी ३ सामन्यांत ४ गुण मिळवले असून त्यांचा नेट रनरेट -०.८८८ आहे.

न्यूझीलंड पाचव्या क्रमांकावर, पाकिस्तान तळाशी

गुणतालिकेत न्यूझीलंडचा संघ पाचव्या स्थानावर आहे, त्यांच्याकडे ३ सामन्यांतून २ गुण असून नेट रनरेट -०.२४५ आहे. तळाच्या तीन स्थानांवर आशियाई संघ आहेत, बांग्लादेशने ३ पैकी १ सामना जिंकून सहावा क्रमांक मिळवला आहे. श्रीलंका एकाच गुणासह सातव्या क्रमांकावर आहे, तर पाकिस्तानचा संघ तीनही सामने हरल्यानंतर शेवटच्या पायरीवर म्हणजे आठव्या स्थानावर आहे. इंग्लंडविरुद्ध टीम इंडियाचा सामना निर्णायक ठरणार

हरमनप्रीत कौरच्या टीम इंडियाला सलग दुसर्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. आधी दक्षिण आफ्रिका आणि आता ऑस्ट्रेलियाने भारतावर मात केली. गुणतालिकेत भारत तिसर्या स्थानावर कायम असला तरी संघाचा नेट रनरेट (+०.६८२) घसरला आहे. पुढचा सामना १९ ऑक्टोबरला इंदूरमध्ये इंग्लंडविरुद्ध होणार आहे, इंग्लंडचा अजूनपर्यंत एकही पराभव झालेला नाही, त्यामुळे हा सामना भारतासाठी निर्णायक ठरणार आहे.

## भारत-पाकिस्तान हॉकी सामना बरोबरीत

**जोहोर (मलेशिया) :** भारताच्या ज्युनिअर पुरुष हॉकी संघाने चुरशीच्या सामन्यात मंगळवारी पाकिस्तानला सुलतान जोहोर चषक स्पर्धेच्या साखळी सामन्यात ३-३ असे बरोबरीत रोखले. परंतु, या सामन्यात सर्वाधिक चर्चा रंगली ती दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांसह केलेल्या हातमिळवणीची. सामन्याच्या सुरुवातीला दोन्ही संघाच्या खेळाडूंनी एकमेकांना हाय फाइव्ह दिल्यानंतर सामना संपल्यानंतर हस्तांदोलनही केले.गेल्या महिन्यात झालेल्या क्रिकेट टी-२० आशिया चषक स्पर्धेत भारत-पाकिस्तान अंतिम सामन्यासह तीनवेळा एकमेकांविरुद्ध भिडले. या तिन्ही सामन्यांत भारतीयांनी पाक खेळाडूंशी हस्तांदोलन केले नव्हते.

तसेच, सध्या सुरू असलेल्या महिला



विश्वचषक स्पर्धेतही भारतीय संघाने पाक संघासोबत हात मिळवले नव्हते. परंतु, मंगळवारी भारतीय हॉकीपटूंनी राष्ट्रगीत झाल्यानंतर पाक खेळाडूंना हाय फाइव्ह दिले. सोशल मीडियावरही याची बरीच चर्चा रंगली. त्याआधी, पाकिस्तानच्या खेळाडूंना आधीच मानसिकदृष्ट्या तयार राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. याबाबत पाकच्या एका अधिकार्याने सांगितले, 'खेळाडूंना सांगितले गेले आहे की, जर भारतीय खेळाडूंनी सामन्यापूर्वी किंवा सामन्यानंतर हस्तांदोलन केले नाही, तर त्याकडे दुर्लक्ष करून पुढे निघून जायचे.'दरम्यान, भारताने दोन गोलांनी पिछाडीवरून दमदार पुनरागमन करत आघाडी घेतली, परंतु पाकिस्तानने अखेरच्या क्षणी गोल करून सामना अनिर्णीत राखला. भारताकडून अरिजित सिंग हुंडल (४३वे मिनिट), सौरभ कुशवाहा (४७) आणि मनमीत सिंग (५३) यांनी, तर पाकिस्तानकडून हन्नान शाहिद (५) आणि सूफियान खान (३९ व ५५) यांनी गोल केले.

## भारतीय खेळाडू वेळेत निघूनही ऑस्ट्रेलियाला उशिरा का पोहोचले? नेमकं कारण काय?

**नवी दिल्ली:** रोहित शर्मा विराट कोहलीसह टीम इंडिया ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी १५ ऑक्टोबरला वेळेत रवाना झाली. पण तरीही खेळाडू मात्र थकलेल्या अवस्थेत रात्री उशिरा पर्थमध्ये पोहोचले.

भारतीय संघ पर्थमध्ये दाखल (फोटो- द) ढशरा खपवळर अीर्ळींश ळप झर्शींह: ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना झालेला भारतीय संघ पर्थमध्ये दाखल झाला आहे. पर्थमधूनच भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याला सुरूवात होणार आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात प्रथम वनडे मालिका खेळवली जाणार आहे, ज्यामधील पहिला सामना १९ ऑक्टोबरला पर्थमध्ये होईल. पण यापूर्वी टीम इंडियाचे खेळाडू निश्चित वेळेनुसा उशिरा पर्थमध्ये दाखल झाले, ज्याचा व्हीडिओदेखील समोर आला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली ही भारतीय क्रिकेटमधील जोडगोळी ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेसाठी संघात परतली आहे. हे दोन्ही दिग्गज खेळाडू नवा वनडे कर्णधार शुबमन गिलच्या नेतृत्त्वाखाली ऑस्ट्रेलियात खेळताना दिसतील. रोहित शर्मा, शुबमन गिल आणि विराट कोहली यांच्या भेटीचा व्हीडिओ बीसीसीआयने शेअर केला होता जो प्रचंड व्हायरल झाला होता.रोहित-विराटसह टीम इंडिया पर्थमध्ये दाखल

१५ ऑक्टोबर रोजी पहाटे दिल्ली विमानतळावर दाखल झालेल्या शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील संघाने पहाटे ४ वाजता पर्थमधील त्यांच्या हॉटेलमध्ये चेक इन केलं. ऑस्ट्रेलियातून येणाऱ्या वृत्तांनुसार, दिल्लीतील विमान नियोजित वेळेपेक्षा सुमारे चार तास उशिराने होतं. त्यामुळे सिंगापूरमध्ये जोडलेली उड्डाणं आणि ट्रांझिट वेळापत्रकात फेरबदल झाला, आणि त्यामुळे पोहोचण्याची वेळेत अधिक विलंब झाला.दिल्लीतील विमानाच्या विलंबामुळे सिंगापूरमधील वेळापत्रकातही बदल करण्यात आला, परिणामी भारतीय संघ १६ ऑक्टोबरला पहाटे पर्थमध्ये पोहोचला. भारतीय खेळाडूंची पहिली तुकडी पर्थला पोहोचली तेव्हा विराट कोहली, रोहित शर्मा, शुबमन गिल आणि केएल राहुल उपस्थित होते. भारत मिशेल मार्शच्या नेतृत्त्वाखालील संघाविरूद्ध ३ एकदिवसीय आणि ५ टी-२० सामने खेळेल, ही मालिका १९ ऑक्टोबरपासून सुरू होईल.

'ही' स्पर्धा ठरू शकते अखेरची

भारतीय क्रिकेट पत्रकार विमल कुमार यांनी दिलेल्या वृत्तानुसार, पर्थ विमानतळावर कडक सुरक्षा व्यवस्था होती आणि त्यामुळे काही चाहते त्यांच्या आवडत्या स्टार खेळाडूंची एक झलक पाहण्यासाठी भारतीय संघाच्या हॉटेलबाहेर वाट पाहत होते. पण, रात्री बराच उशीर झाल्यामुळे, थकलेले भारतीय खेळाडू हॉटेलबाहेर वाट पाहणाऱ्या चाहत्यांसह फोटो वगैरे न काढता थेट हॉटेलमध्ये गेले.







## तो १४ वर्षाचा नसून....वैभव सूर्यवंशीबद्दल ऑस्ट्रेलियाच्या दिग्गज खेळाडूचा सर्वात मोठा दावा

दिल्ली-वैभव सूर्यवंशीने क्रिकेट विश्वात वादळ आणले आहे. आधी त्याने आयपीएल, नंतर इंग्लंड आणि आता ऑस्ट्रेलियात आपल्या स्फोटाक फलंदाजीने पुन्हा एकदा आपली दखल घेण्यास भाग पाडले आहे. राजस्थान रॉयल्सने १३ वर्षाच्या वैभव सूर्यवंशी १.१ कोटीमध्ये खरेदी केल्यानंतर सर्वात आधी तो प्रकाशझोतात आला होता. त्यानेही तो विश्वास सार्थ करुन दाखवला. वयाच्या १४ व्या वर्षी गुजरात टायटन्सविरोधात तुफानी खेळी करत त्याने आयपीएलमधील पहिले शतक ठोकले. इतक्या कमी वयात शतक ठोकणारा तो आयपीएलमधील पहिला खेळाडूही ठरला. यानंतर त्याने अंडर-१९ संघात इंग्लंडविरोधात खेळताना ७८ चेंडूत १४३ धावा केल्या. ऑस्ट्रेलिया संघालाही त्याने सोडले नाही. युथ टेस्टमध्ये अंडर-१९ संघात खेळताने त्याने फक्त ६२ चेंडूत १०४ धावा केल्या.

पण, २८ एप्रिलच्या रात्री जयपूरमध्ये सवाई मानसिंग स्टेडियमवर ३५ चेंडूत त्याने केलेली शतकी खेळी अद्यापही पहिल्या स्थानावर आहे. सूर्यवंशीने भारतासाठी खेळलेल्या काही अनुभवी गोलंदाजांना टोले लगावताना अजिबात दया दाखवली नाही. सूर्यवंशीने १०१ धावा केल्या, ज्यात सात चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता, ज्यामुळे रॉयल्सना १६ षटकांत २१० धावांचं आव्हान पूर्ण करण्यात मदत झाली. १४ वर्षाच्या मुलाने अशी खेळी करताना पाहून अनेकांचा विश्वासच बसत नव्हता. रवी शास्त्री यांनी आठवण करून दिली की ऑस्ट्रेलियाचा महान खेळाडू मॅथ्यू हेडन सूर्यवंशीच्या वयावर विश्वास ठेवण्यास कसा नकार देत होता.

''मी आश्चर्यचकित झालो. जयपूरमधील त्या सामन्यात मी समालोचन करत होतो.





मी चौथ्या षटकात ऑन एअर गेलो आणि मी सलग दोन वेळा समालोचन केले कारण तोपर्यंत आमच्याकडे एक समालोचक कमी होता. नवव्या, दहाव्या षटकात, त्याने १०० धावा केल्या होत्या. तो मोहम्मद सिराज, इशांत शर्मा यांना एक्स्ट्रा कव्हर आणि मिडविकेटवर सलग १० फटके लगावले. हेडोस (मॅथ्यू हेडन) तिथे होता आणि तो म्हणाला, 'अरे हा १४ वर्षाचा असू शकत नाही', आणि मी म्हणालो, 'चला, शांत व्हा',' असे शास्त्रींनी डळडढछठ स्पोर्ट पॉडकास्टवरील विलो टॉक शोमध्ये सांगितले.

सूर्यवंशीसमोर भविष्यात मोठं आव्हान

सूर्यवंशीमध्ये प्रतिभा आहे, यात शंका नाही. मात्र भारतीय क्रिकेटमधील एक कटू सत्य हे आहे की अनेक प्रतिभावान क्रिकेटपटू मागे पडले आहेत आणि वाटेतच त्यांचं करिअर संपलं आहे. सूर्यवंशीला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये प्रोत्साहन मिळत असल्याचं कौतुक होत असताना रवी शास्त्री यांनी त्याला सल्ला दिला आहे.

''त्याच्यासाठी सध्याचा काळ सर्वात कठीण आहे. कारण त्याने सचिनसारखाच इतक्या लहान वयात आणि स्वत:वर छाप पाडली आहे. आता, पुढच्या २-३ वर्षात, त्याला मार्गदर्शन करण्यासाठी कोणीतरी हवं आहे कारण तुम्ही खूप लवकर मार्गावरुन भटकू शकता. ते तुमच्या डोक्यात जाऊ शकतं. अपेक्षा जास्त असतात, तुम्ही ते हाताळू शकणार नाही. इथेच कोणीतरी त्याला जाऊन सांगावं लागेल की, 'तुम्हाला कधीतरी अपयश येणारच'. हा खेळ समतोल साधणारा आहे. म्हणून नाराज होऊ नका. हा जीवनाचा एक भाग आहे, परंतु तुम्ही जे करत आहात त्यावर टिकून राहा आणि एकदा तुम्ही अपयश स्वीकारायला सुरुवात केली की, ते तुमच्या प्रगतीत स्वीकारा, तेव्हाच तुम्ही चांगले कराल. पण हा त्याच्यासाठी एक महत्त्वाचा काळ आहे,'' असं भारताचे माजी प्रशिक्षक पुढे म्हणाले. सूर्यवंशीची तुलना सचिन तेंडुलकर आणि विराट कोहलीसारख्या दिग्गजांशी केली जात आहे. तथापि, भारतीय क्रिकेटने फक्त एकच तेंडुलकर आणि कोहली पाहिला आहे याचं एक कारण आहे. शास्त्री यांनी इतिहास या प्रश्नाचं खरे उत्तर देऊ शकेल, तरी सूर्यवंशीला तेंडुलकर किंवा कोहली यांच्यासारख्याच नावाने ओळखण्यासाठी अजून बराच पल्ला गाठायचा आहे असे त्यांनी म्हटले आहे.

## १८ ऑक्टोबर रोजी सरस्वती संगीत परिवाराच्या वतीने सूरमयी दिपावली पहाट कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी** :प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालय,मराठवाडा संगीत कला अकादमी व दत्त मंदिर संस्थान, औसा रोड, लातूर, रोटरी क्लब, डी.एस .परिवार,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६:१५ वाजता दत्त मंदिर, औसा रोड,लातूर याठिकाणी सूरमयी दिपावली पहाट या देखण्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून सर्व लातूरकर संगीत रसिकांना ही दिवाळीची मेजवानी ठरणार आहे.या दिपावली पहाट कार्यक्रमाप्रसंगी मुंबई येथील सुप्रसिद्ध सितार वादिका कु.गरिमा व रिद्धिमा शेजल भगिनी यांच्या सितारवादनाची जुगलबंदी सादर होणार आहे.तसेच युवा गायक श्री.अनिरुद्ध वाघचवरे, सोलापूर (सुवर्ण पदक विजेता ) यांचे सुश्राव्य गायन तसेच प्रा. लक्ष्मण श्रीमंगले,कु.प्रीती उदगीरकर यांचे सुगम व भक्तिगीत गायन संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व श्रोत्यांकडून हरिनामाचा गजर होईल. याप्रसंगी नामांकित कलावंत आपली कला सादर करणार आहेत. उपस्थित रसिकांसोबत दिपावली पहाट कार्यक्रमात नामधून जप सामूहिकरीत्या गायले जाणार असून यामध्ये सर्व रसिक श्रोते यांना सामावून घेतले जाणार आहे. तरी, या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने संगीत प्रेमींनी, सर्व भक्तगण यांनी उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे सरस्वती संगीत कला अकादमीचे अध्यक्ष संयोजक तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी केले आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. विश्वनाथ स्वामी,प्रा.गणेश बोरगावकर, प्र.प्राचार्य डॉ. सुदाम पवार,प्रा.तुकाराम आवाड, प्रा. बालाजी शिंदे,प्रा. अमोल जाधव हे परिश्रम घेत आहेत.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात "इनोव्हेट अँड इन्व्हेस्टिगेट रिसर्च मेथडॉलॉजी मास्टरक्लास" कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील पदव्युत्तर संशोधन समिती यांच्या वतीने एम.कॉम. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''इनोव्हेट अँड इन्व्हेस्टिगेट रिसर्च मेथडॉलॉजी मास्टरक्लास'' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. एच.एस. पाटील (स्कूल ऑफ मॅनेजमेंट सायन्स, विद्यापीठ सब-सेंटर, लातूर) यांनी विद्यार्थ्यांना संशोधन प्रक्रियेतील विविध पैलूंवर मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीशास्त्रातील नावीन्यपूर्ण दृष्टिकोन, फील्डवर्क कसे प्रभावीपणे करावे, संशोधन प्रकल्प व प्रबंध कसा लिहावा, तसेच संशोधनासाठी उपयुक्त तंत्रे व सर्वोत्तम पद्धती याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. या कार्यशाळेस उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक पदव्युत्तर संशोधन समिती प्रमुख डॉ.बालाजी कळंबे यांनी केले व सूत्र संचलन प्रा अनुजा कांबळे यांनी केले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यशस्वितेसाठी डॉ. बालाजी कळंबे, डॉ. आर.एन. गिल्डा, प्रा.अनुजा कांबळे, प्रा.शैलजा चिकटे, व डॉ. के.डी. औसेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय शालेय वुशू स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी महाराष्ट्रात प्रथम, जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**लातूर/प्रतिनिधी** : दि.०९ ते ११ ऑक्टोंबर २०२५ या दरम्यान क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद,छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित छत्रपती संभाजीनगर




येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय वुशू स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा ११ वीचा गणेश शिवशंकर गुणाले हा विद्यार्थी यू/१७ व ७० गटात महाराष्ट्रात सर्वप्रथम आला.त्यामुळे तो जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी पात्र झालेला आहे.या यशस्वी खेळाडू विद्यार्थ्याचे अभिनंदन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी केले तसेच उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांच्या हस्ते त्याचा यथोचित सत्कार करण्यात आला.या यशस्वी विद्यार्थ्याला डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा.विनोद गेवारे,प्रा.वैष्णवी जोशी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. सदरील विजयी खेळाडूचे अभिनंदन पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर, कार्यालीन अधीक्षक नवनाथ,प्रा कविता जाधव,डॉ.कोमल गोमारे, प्रा. व्यंकट केले, प्रा.बळवंत सूर्यवंशी, प्रा. विजयकुमार मांदळे, प्रा. मनोज पाटील, दिलीप राठोड,रवी लाहोटी, सुहास परवते यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही केले आहे.

### लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिन

# ग्रंथ वाचनामुळे नवी प्रेरणा मिळते -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**लातूर/प्रतिनिधी** : ग्रंथ वाचन हे जीवनात सकारात्मक ऊर्जा देते, तसेच यामुळे नवनवीन संकल्पनांची प्रेरणा देतात, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी आयोजित 'वाचन प्रेरणा दिन' उपक्रमात त्या बोलत होत्या.






जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या उपक्रमात सहभागी अधिकाऱ्यांनी यावेळी ग्रंथ वाचन केले. तसेच आपल्या सहकारी अधिकाऱ्यांना ग्रंथ भेट दिला. अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील व इतर शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

ग्रंथ वाचनाने जीवनात सकारात्मक बदल घडण्यास मदत होते. नवनवीन संकल्पना, सृजनशीलतेला चालना मिळते. ग्रंथ हे चांगले मित्र बनून प्रत्येक परिस्थितीत आपल्या साथ देतात, मार्गदर्शन करतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आयुष्यात वाचनाची आवड जोपासायला हवी. आपण ज्याप्रमाणे मकर संक्रातीला तिळगुळ वाटतो, त्याप्रमाणे पुस्तके भेट देवून वाचन प्रेरणा दिवस साजरा करावा. आपले मित्र, नातेवाईक, कार्यालयातील सहकारी, परिवारातील सदस्य यांना ग्रंथ भेट देवून त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर यांनीही ग्रंथ वाचनामुळे सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होत असल्याचे सांगितले.

प्रारंभी योजना शिक्षणाधिकारी श्रीमती अंधारे यांनी वाचन प्रेरणा दिवसानिमित्त आयोजित उपक्रमाची माहिती दिली. तसेच प्रत्येकाने दररोज काही वेळ ग्रंथ वाचनाला देण्याचे आवाहन केले.

यावेळी अधिकारी, कर्मचारी यांनी ग्रंथ वाचनाविषयी त्यांचे अनुभव कथन केले. शासकीय सेवेत नव्याने दाखल झालेल्या महसूल व शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना यावेळी ग्रंथ भेट देण्यात आला.

## अमृत संवाद मुळे कलबुरगि स्थानकावर नागरिक-रेल्वे संपर्क मजबूत झाला

**सोलापूर/प्रतिनिधी** : विशेष मोहीम ५.० अंतर्गत रेल्वे अधिकारी, प्रवासी आणि भागधारकांमध्ये थेट संवादाचे व्यासपीठ तयार करण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने कलबुरगि रेल्वे स्थानकावर ''अमृत संवाद'' कार्यक्रमाचे आयोजन केले. अमृत संवाद उपक्रम हा रेल्वे नेटवर्कच्या विकास प्रवासात पारदर्शकता, समावेशकता आणि सहभाग वाढविण्यासाठी भारतीय रेल्वेच्या नागरिक-केंद्रित दृष्टिकोनाचा एक भाग आहे. या कार्यक्रमात प्रवाशांना आणि भागधारकांना सुविधा आणि सेवांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी त्यांचे मौल्यवान अभिप्राय, अनुभव आणि सूचना सामायिक करण्यास प्रोत्साहित केले गेले.

**अमृत संवादाचे ठळक मुद्दे:**

या कार्यक्रमात अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत अमृत स्थानकांवर केलेल्या प्रमुख सुधारणांचे मूल्यांकन आणि प्रदर्शन करण्यावर भर देण्यात आला, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे:

-अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत केलेल्या सुधारणांचे मूल्यांकन
-सध्या सुरू असलेल्या विकासात्मक उपक्रमांबद्दल नागरिकांकडून मिळालेले अभिप्राय




-प्रवाशांच्या सोयीसाठी सुधारणांच्या पुढील क्षेत्रांची ओळख
-भारतीय रेल्वेच्या विकास प्रवासात जनतेच्या सहभागाला प्रोत्साहन
-स्वच्छता आणि स्थानक देखभालीत प्रवाशांच्या भूमिकेबद्दल जागरूकता वाढविणे

डीआरएम सोलापूर आणि सिनिअर डीसीएम, डीईएन (दक्षिण), एडीईएन (जीएसयू) आणि एडीईएन कलबुरगि यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, कल्याण कर्नाटक चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (केकेसीसीआय), झेडआरयूसीसी, डीआरयूसीसी आणि इतर रेल्वे वापरकर्त्यांसह विविध भागधारक गटांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी झाले आणि प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या गरजा आणि अपेक्षा समजून घेतल्या.

कलबुरगि स्टेशनवरील अमृत संवादाने नागरिक आणि भारतीय रेल्वे यांच्यातील भागीदारीची भावना बळकट केली. मुक्त संवादाला प्रोत्साहन देणे, अभिप्रायांना प्रोत्साहन देणे आणि सुधारणा प्रक्रियेत जनतेला सहभागी करून घेणे, हे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाची सेवा उत्कृष्टता आणि प्रवाशांच्या समाधानासाठी सतत वचनबद्धता दर्शवते.

## इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलचे दयानंद शिक्षण संस्थेला सदस्यत्व

**लातूर/प्रतिनिधी** : येथील गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा जपणारी अग्रगण्य संस्था म्हणून सर्वत्र सुपरिचित असलेल्या दयानंद शिक्षण संस्थेला इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलचे (आयजीबीसी) सदस्यत्व स्वीकारलेले आहे.या इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल चळवळीत सामील होण्यासाठी आयजीबीसी ही वैयक्तिक आणि संस्थात्मक सदस्यत्वांसह विविध प्रकारची सदस्यता देते.यामध्ये दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी संस्थेची सदस्य म्हणून नोंदणी केली आणि सदस्यत्व प्राप्त झाले आहे.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी,ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर,अभियंता किरण खमितकर,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर, प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.पुनम नथानी, प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते, प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस, प्राचार्य प्रीती पटवारी,प्रा.अनिलकुमार माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड हे या उपक्रमाचे नोडल अधिकारी म्हणून कार्य करणार आहेत.आयजीबीसी ही संस्था सदस्यत्व संसाधनांमध्ये प्रवेश,नेटवर्किंग संधी आणि कार्यक्रमांवर सवलती देऊन स्पर्धात्मक धार प्रदान करते.सर्व श्रेणींसाठी सामान्य सदस्यत्व प्राप्त झाल्यानंतर ग्रीन बिल्डिंग वकिलीत सक्रिय भूमिका बजावण्याची संधी,नेटवर्किंगसाठी प्लॅटफॉर्म,स्थानिक अध्याय उपक्रमांमध्ये आयजीबीसी कार्यक्रमांसाठी सहभाग नोंदविता येत असतो.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात केंद्रीय युवक महोत्सव २०२५ उत्साहात संपन्न

### अमरावती विभागाकडे सर्वसाधारण विजेतेपद

**नाशिक/प्रतिनिधी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय युवक महोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात अमरावती विभागाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचा अविष्कार असलेल्या या महोत्सवात विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर, नाशिक, मुंबई, नागपूर, पुणे, अमरावती, नांदेड व कोल्हापूर या आठही विभागीय केंद्रातील राज्यभरातील ४१ विद्यार्थी व ६३ विद्यार्थीनीं असे १०४ जण सहभागी झाले होते. त्यातील विजेत्या ४८ विद्यार्थ्यांची मा. राजभवन (महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार दिनांक ०५ ते ०९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आलेल्या यंदाच्या आंतर राज्य युवक महोत्सव 'इंद्रधनुष्य २०२५' साठी निवड करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ मुख्यालयात या केंद्रीय युवक महोत्सवास सुप्रसिद्ध नाट्य व चित्रपट अभिनेते श्री. भूषण कडू व अभिनेत्री श्रीमती वर्षा कांबळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन होते. महोत्सवाच्या उद्घाटनपर भाषणात अभिनेते भूषण कडू यांनी संस्कृती - कला अभिनय या माध्यमातून व्यक्तीचे व्यक्तिमत समृद्ध होत असल्याचे सांगितले. कोणतेही शिक्षण वाया न जाता त्याचा भविष्यात सदुपयोग करता येतो हे त्यांनी सोदाहरण सांगितले. तसेच युवकांनी समाजातील एकाकी असलेल्या वयोवृद्ध नागरिकांशी संवाद साधावा असे आवाहन आपल्या भाषणाच्या अखेरीस केले. अभिनेत्री श्रीमती वर्षा कांबळी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष पदावरून बोलतांना विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी अशा युवक महोत्सवातून असंख्य चांगले कलाकार उदयास आल्याचे उदाहरण देत सांगितले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार क्रमिक शिक्षणासोबत अंगभूत कलागुणांना देखील पुरेपूर वाव देण्यात आहे. ज्याचा समाज देशाच्या प्रगतीसाठी फायदा होवू शकत



असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. व्यासपीठावर निरंतर शिक्षण विद्याशाखा संचालक डॉ. जयदीप निकम, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महोत्सवातील विविध स्पर्धांनिहाय विजेते पुढीलप्रमाणे संगीत ऐश्वर्या चव्हाण व विनायक शीलवंत (सुगम गायन कोल्हापूर), वेदश्री गवळी (पाश्चिमात्य गायन अमरावती), शास्त्रीय वादन अनिकेत जाधव (तालवाद्य पुणे), गंधार भारती (सूरवाद्य अमरावती), समूहगीत कोल्हापूर व नाशिक, लोकसंगीत वाद्यवृंद कोल्हापूर, एकांकिका जीवनशैली (नांदेड), मुकाभिनय महिला अत्याचार (अमरावती), प्रहसन (स्कीट) पाल चिकटली (अमरावती) व स्त्री शक्ती (नांदेड), नृत्य शिवांगी आखाडे (कथ्थक कोल्हापूर), सविता गुर्गी (भरतनाट्य पुणे), समूहनृत्य राजस्थानी (जळगाव), वैयक्तिक नृत्य अभिषेक नांदुरे (लल्लाटी भंडार), जोडी नृत्य निशांत नाकतोडे व संध्या शेंडे (नागपूर आदिवासी), वादविवाद साक्षी गवळे (नांदेड), श्रेयस इंगळे (अमरावती), प्रश्नमंजुषा प्रणव जाधव (नाशिक) व श्रेयस इंगळे (अमरावती), वक्तृत्व सौरभ गायकवाड (नाशिक) व प्रथमेश श्रीवास (अमरावती), स्पॉट फोटोग्राफी सौरभ गायकवाड (नाशिक), युनुस शेख (कोल्हापूर) व साहिल इनामदार (छत्रपती संभाजीनगर), स्थळचित्रण दिपाली कलाल (अमरावती), रांगोळी शुभेच्छा दिगंबर (अमरावती) व राम बिबवनकर (कोल्हापूर), मुक्तहस्त (कोलाज) सोहेल इनामदार (नांदेड) व अंकिता जाधव (नाशिक), व्यंगचित्र रिजवान शेख (अमरावती) व सुरेख गवाले (नांदेड), मूर्तीकला वैभव गिराम (नांदेड), पोस्टर मेकिंग सर्वेश खांबल (कोल्हापूर) व सुरेख गवाले (नांदेड), परीक्षक म्हणून श्री. सतीश वराडे, श्री. राहुल गायकवाड, श्री. हृषिकेश शेलार, कु. सुरभी गौड, श्री. प्रदीप गोरडे, सौ. सविता ताडगे, श्री. राजेंद्र उगले, सौ. मोनाली देशमुख, श्रीमती. शुभांगी बैरागी, सौ. आरती बोराडे यांनी काम पाहिले. हार्मोनियम व तबलाची साथसंगत श्री. कृष्णा जाधव व श्री. अशोक बैरागी यांनी दिली. रंगभूषाकार म्हणून श्री. माणिक कानडे यांनी काम पाहिले. प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांनी तर सूत्रसंचलन डॉ. माधुरी खर्जुल व डॉ. पूनम वाघ यांनी केले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी गठीत विविध समित्यांचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## रेणापूर येथील शेख रिजवान देशात तिसरा आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी** : औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रिशियन या विषयात ९९.१६ टक्के गुण मिळवून रेणापूर येथील शेख रिजवान शहेनशाह या विद्यार्थ्याने देशात तिसऱ्या क्रमांकाचे घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



रेणापूर येथील शेख शहेनशाह सुलेमान यांचा मुलगा शेख रिजवान याने चाकूर नजीक ग्रामीण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत इलेक्ट्रिशियन करिता प्रवेश घेतला होता. जिद्द आणि मेहनत करून शेख रिजवान याने ९९.१६ टक्के गुण मिळवून देशात तिसऱ्या क्रमांकाचे घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपा शहराध्यक्ष अच्युत कातळे, शेख रिजवान यांचे वडील शेख शहेनशाह, चुलते शेख खलील, मारूफ अत्तार, शेख सलीम, शेख मकसूद, रफिक शिकलकर यांच्यासह इतर अनेक जण होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मांजराच्या नूतन हार्वेस्टर,इन्फीडर, इंधन वाहतूक वाहनाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते पुजन

## ९ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दीष्ट : माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यांतील सहकारी साखर कारखानदारीत अव्वल स्थानावर असलेल्या विलास नगर लातूर येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने घेतलेल्या स्वमालकीचे हार्वे स्टर, इन्फिडर व कारखान्याच्या वाहनांसाठी इंधन पुरवठ्यासाठी घेतलेल्या नूतन वाहनांचे पुजन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांच्या शुभ हस्ते गुरूवारी संपन्न झाले. यावेळी कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे संचालक श्रीशैल्य उटगे, संचालक कैलास पाटील, तात्यासाहेब देशमुख, सदाशिव कदम, दयानंद बिडवे, सचिन शिंदे,श्रीकृष्ण काळे ,अनिल तरकसे,



बाळासाहेब पांढरे, वसंत उपाडे , मदन भिसे,ज्ञानेश्वर पवार,निळकंठ बचाटे,शंकर बोळंगे, अरुण कापरे, कार्यकारी संचालक पंडीत देसाई, सचिन दाताळ, बाळासाहेब कदम, हरिराम कुलकर्णी विकास देशमुख विविध खाते प्रमुख,अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

हार्वेस्टरद्वारे उसाची तोडणी होणार

कारखान्याकडून चालु गळीत हंगाम २०२५-२६ यशस्वी करण्यासाठी सर्व तयारी करण्यात आली असून ऊस उत्पादक शेतक-यांचा ऊस वेळेवर गाळप व्हावा यासाठी पुर्ण क्षमतेने ऊस तोडणी यंत्राचा वापर मांजरा कारखाना करत असून यासाठी स्वमालकीचे जवळपास २५ ऊस तोडणी यंत्र खरेदी केलेले आहेत. त्यामुळें आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व उसाचे गाळप करनार असल्याचे चेअरमन तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी यावेळी बोलताना सांगितले

चालू गाळप यशस्वी होईल

राज्यात देशात नावलौकिक असलेल्या मांजरा साखर कारखान्याने माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी मंत्री आमदार अमितजी देशमुख, जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज भैया देशमुख साहेब यांच्या सहकार्याने यशस्वी वाटचाल सुरू ठेवली असून योग्य ऊस दर मिळत असल्याने आपला ऊस गाळपासाठी मांजरा कारखान्याकडे देण्याचा कल शेतक-यांचा नेहमी राहीला आहे. यावर्षी ही राहील अशी अपेक्षा कारखाना प्रशासनाकडून यावेळी व्यक्त केली गळीत हंगाम २०२५ -२६ मध्ये गाळपासाठी आलेल्या ऊसाला प्रती हेक्टरी किमान ३१५० /- ऊस दर राहील असे सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी मांजराच्या सर्वसाधारण सभेत जाहीर केले होते. त्यामुळे शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# ‘केशवराज’मध्ये दीपोत्सव उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१५ ऑक्टोबर २०२५ बुधवार रोजी दीपावलीनिमित्त दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी, संजय गुरव, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तसेच प्रमुख वक्त्या क्षमा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी विषय मांडणी करताना प्रमुख वक्त्या क्षमा कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृतीत सण-उत्सवास खूप महत्त्व आहे असे सांगून दिवाळी सणाची पौराणिक पार्श्वभूमी सांगितली. दिवाळी सण हा पाच दिवसांचा असून त्यातील वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, बलिप्रतिपदा व भाऊबीज या पाचही दिवसांचे महत्त्व सांगितले. सामाजिक बांधिलकी जोपासणारा, आप्तेष्ट, नातेवाईक यांच्या भेटी घडवून आणणारा, सगळीकडे आनंद पसरवणारा हा सण भारतभर सर्वत्र साजरा केला जातो, असे याप्रसंगी त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर यांनी सर्वांना स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन



करून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी यांनी दीपावलीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रावणी सोमेश्वर ईश्वरशेटे हिचा दहावी बोर्ड परीक्षेत लातूर बोर्डातून प्रथम क्रमांक आल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने पालकांसमवेत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयात सर्वत्र दीप लावण्यात आले. संपूर्ण शाळा दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघाली. यावेळी विद्यालयाच्या वतीने सर्वांना दीपावलीनिमित्त फराळाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत कार्यक्रम प्रमुख सुनिता बनसोडे यांनी केले. प्रभू श्रीरामांचा जयजयकार करणारे गीतरामायणातील गीत विद्यालयाचे संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वैशाली फुलसे यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, कार्यक्रम प्रमुख सुनिता बनसोडे, सहप्रमुख अपर्णा स्वामी तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पालिकेच्या संकलन केंद्रावर नागरिकांनी दिल्या शेकडो वस्तू

## मनपाच्या आवाहनास लातूरकरांचा भरभरून प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** दीपावली निमित्त घराची स्वच्छता करताना नागरिकांनी घरातील अनावश्यक वस्तू मानपाने सुरू केलेल्या संकलन केंद्रात द्याव्यात,असे आवाहन करण्यात आले होते. त्याला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या वस्तू गरजवंतांना दिल्या जाणार आहेत.

नागरिक घराची स्वच्छता करतात तेव्हा अनेक अनावश्यक वस्तू निघतात.या वस्तू कचऱ्यात टाकण्याऐवजी संकलन केंद्रात द्याव्यात, असे आवाहन करत पालिकेच्या वतीने प्रत्येक प्रभागात संकलन केंद्र उभारण्यात आले होते. पालिकेने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील नागरिकांनी जुने कपडे व उपयोगी पडू शकेल असे साहित्य केंद्रावर जमा केले. मोठ्या प्रमाणात कपडे, सतरंज्या, १५ इलेक्ट्रॉनिक वस्तू,चप्पल - बुटांचे जोड,लोखंडी वस्तू जमा झाल्या. मनपाच्या



वतीने पहिल्यांदाच हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमास भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल आयुक्त श्रीमती मानसी यांनी लातूरकर जनतेचे आभार मानले. या सर्व केंद्रावर जमा झालेले साहित्य गरजू लोकांना सामाजिक संस्थेच्या माध्यमातून पोचवले जाणार असल्याचेही श्रीमती मानसी यांनी सांगितले.

### मनपाच्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रात अद्ययावत उपकारणांचे लोकार्पण; आयडीबीआय बँकेच्या पुढाकारातून साहित्य उपलब्ध



**लातूर/प्रतिनिधी :** आयडीबीआय बँकेच्या सीएसआर फंडातून मनपाच्या गौतम नगर येथील प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रासाठी आवश्यक उपकरणे देण्यात आली.पालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्या उपस्थितीत या उपकरणांचे लोकार्पण करण्यात आले.

बँकेच्या पुढाकारातून दंत शल्य चिकित्सा आद्ययावत करण्यासाठी आवश्यक असणारी उपकरणे आरोग्य केंद्राला देण्यात आली. या कार्यक्रमास उपायुक्त पंजाबराव खानसोळे, बँकेचे क्षेत्रीय प्रमुख एकनाथ जाधव,शाखा प्रबंधक अजिंक्य पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.शंकर भारती, क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे यांच्यासह आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या केंद्रातील दंत शल्य चिकित्सा अद्ययावत झाल्याने गरजू नागरिकांना मोठा लाभ होणार आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

### दयानंद कला महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा




**लातूर/प्रतिनिधी :** दि १५ -१० -२०२५ रोजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून दिवाळीमध्ये फटाक्यांच्या ऐवजी विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचन करावे यानिमित्त ग्रंथभेट देऊन वाचन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना दिवाळीमध्ये फटाक्याच्या ऐवजी ग्रंथ वाचन करावे असे आवाहन केले त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांना वाचन करण्यासाठी एक ग्रंथ भेट दिले.

दिवाळीत फटाके वाजवल्यानंतर वातावरणात होणाऱ्या प्रदूषणाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी फटाके न वाजवता प्रत्येक विद्यार्थ्यांने पुस्तकांचे वाचन करावे आणि आपल्या ज्ञानात वाढ करुन दिवाळी उत्सव आनंदात साजरा करावा असे प्रतिपादन त्यांनी केले. पुस्तक हे मानवाचा मित्र आहे समाजाचे वास्तव चित्रण पुस्तक वाचल्यामुळे लक्षात येते म्हणून साहित्य समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते म्हणून सूखी व आनंदी जिवनासाठी आजच्या तंत्रज्ञानाच्या योगात मोबाईलचा वापर कमी करुन विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ग्रंथ वाचन केले पाहिजे. यावेळी वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्राचार्यांच्या हस्ते १०१ ग्रंथ भेट देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी ग्रंथाचे वाचन करुन त्याचा अहवाल लिहून द्यावा असे आवाहन करण्यात आले.

दिवाळीमध्ये वाचण्यासाठी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांनी एकूण १० ग्रंथ, मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. अंकुशकुमार चव्हाण यांनी एकूण १५ ग्रंथ, ग्रंथपाल डॉ. अपर्णा पसारकर यांनी एकूण २५ ग्रंथ व ज्येष्ठ साहित्यिक रुचा कुलकर्णी यांनी एकूण १० ग्रंथ देणगी स्वरूपात देऊन सहकार्य केले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, स्वयं अर्थशाह्य कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनिलकुमार माळी, ग्रंथपाल डॉ. अपर्णा पसारकर, प्राध्यापक, ग्रंथालयीन कर्मचारी श्रीकांत जोशी ,माधव गायकवाड, दिलीप गिरबणे, विक्रमसिंग ठाकूर, डॉ सौदागर निगोडे, श्रीमती संगीता मोरे, संकेत भालेराव ,कृष्णा दहिफळे, ओमकार बादाडे व मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### वसुबारस सण ..

दिवाळी सण समूह
एकाहून दुजा सरस
प्रत्येका विविधखूण
कहाणी गुण सुरस

गो वत्स करा पूजन
आला प्रथम दिवस
प्राण्यांचे माना ऋण
साजरा रे वसु बारस

गरीबा द्या नवी वस्त्रे
फराळी भोज सकस
वाटावा बोनस वेतन
कुणाचा नको विरस

फटाकेविरहीत सण
नको फुकाचे धाडस
स्नेहदीप द्यावे घ्यावे
सांभाळा नीटपाडस

पणत्या तेवा शेजारी
ज्योत करा दक्षिणेस
यम दीप दान महत्व
मृत्यू झुंज दे साहस

विष्णू पुजन सुहास्य
आजचं रमाएकादस
किसन पुजेचे महत्व
नैवेद्यास दुग्ध खर्वस

दिपोत्सव जागोजाग
पुजावी कृष्ण तुळस
वरिष्ठा नमन आदरे
कृतज्ञता व्यक्तमानस

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
जाहीर सुचना
दिनांक :- १६.१०.२०२५
आपणास कळविण्यात येते की, भारतीय रेल यांच्या वतीने या कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात बोहाळी, ता. पंढरपुर येथे भारतीय रेल्वेच्या कर्षण उपकेंद्र उभारण्यासाठी १३२ केव्ही बोहाळी रेल उपकेंद्र, बोहाळी, ता. पंढरपुर, जि. सोलापूर या वाहिनीच्या उभारणीचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले आहे. सदर वाहिनी हि ०५.९५१ कि.मी. लांबीची असून ती दि. १७.१०.२०२५ रोजी किंवा त्यानंतर केंव्हाही विद्युत प्रवाहित करण्यात येणार आहे. सदर अतिउच्च दाब विद्युत वाहिनी सोलापूर जिल्ह्यातील उंबरगाव, खर्डी, बोहाळी ता. पंढरपुर, जि. सोलापूर येथील संबंधित वाडी वस्ती भागातून जात आहे. सदर विद्युत वाहिनी वरील गावाजवळ असल्यामुळे नागरिकांनी या वाहिनीच्या मनोऱ्यावर चढणे, लाईन खालून लोखंडी खांब, बांबू वगैरेसारख्या वस्तू नेणे, मनोऱ्याला जनावरे बांधणे, त्याचप्रमाणे लाईन खाली कोणतेही वाहन उभे करुन ठेवणे इत्यादी किंवा तत्सम प्रकार धोकादायक कामे करु नये कारण त्यापासून मानवी जीवास व प्राणीमात्रास गंभीर इजा होण्याचा संभव आहे. वरील सुचनांचे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही जिवितहानी व अपघातासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी जबाबदार राहणार नाही.
सही/-
Apex-80 (श्री. एस.एफ. देशमुख), कार्यकारी अभियंता, अउदा प्रकल्प विभाग-३, सोलापूर

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा
ई-निविदा सूचना क्रमांक एनएलजी/०५/सन २०२५-२६ (ऑनलाईन)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा-४१३५२१ (दुरध्वनी क्रमांक ०२३८४-२४२१३८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत/अनोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून फॉर्म-सी नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदरील निविदेमध्ये ०१ काम समाविष्ट असून या निविदे अंतर्गत संपूर्ण माहिती http://mahapwd.gov.in व http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी दिनांक **१७.१०.२०२५ ते ०३.११.२०२५ वेळ १०.५५** पर्यंत राहील. उपरोक्त एकत्रित कामाची निविदा किंमत रूपये १.०० कोटी पेक्षा जादा आहे.
http://www.mahapwd.gov.in
http://mahatenders.gov.in
स्वाक्षरित/-
सुनिल गो. बिराजदार
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६